म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय भा.व्या
दा क्र २५९५
IRBK-0102595



वा. क्र. २५०५

मराठी भाषेतील

# आधुनिक वाङ्मयप्रकार

लेखक

म. भा. भोसले

प्रथमावृत्ति

१९४७

किंमत १ रुपया

प्रकाशक
कृ. रा. केळकर
मु. पो. भिलवडी
जिल्हा सातारा

* * * *

या पुस्तकासंबंधी
सगळे अधिकार
लेखकाचे स्वाधीन

* * * *

मुद्रक बा. भा. जोशी
ज्ञानविलास प्रेस
बुधवार पुणें २

* * * *

मुखपृष्ठ
चित्रकार
के. दा. जोशी

* * * *

# प्रास्ताविक निवेदन--

आजच्या समृद्ध अशा मराठी वाङ्मयांत जे अनेकविध लेखनप्रकार रूढ झालेले आहेत, त्यांची माहिती मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकाला केव्हांही अगत्याचीच वाटणार! ती माहिती स्थूल मानानें तरी देतां यावी एवढाच या लहान पुस्तकाचा उद्देश आहे.

सदर प्रयत्न करायला गु. अण्णासाहेब बाबर आणि बालभूगोल-कर्ते मि. कृ. रा. केळकर यांचें उत्तेजनच कारणीभूत झालें आहे. शिवाय मि. केळकर आणि मि. ह. न. जोशी (कवि सुधांशु) यांनीं मला लेखनाचे कामीं इतकें साहाय्य केलें आहे कीं, त्याबद्दल औपचारिक आभार मानण्याचा पोकळ शिष्टाचार दाखविण्यापेक्षां त्यांच्या साहाय्याच्या ऋणांत राहाणेंच मला बरें वाटतें.

सदर पुस्तकांत मला आदरणीय असलेल्या ज्या नामवंत साहित्यिकांचे मीं उतारे घेतले, त्या सर्वांनीं मला उदार मनानें ताबडतोब परवानगी दिली याबद्दल त्यांचा मी कृतज्ञ आहें.

हा प्रयत्न वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना व शिक्षक-मित्रांना उपयुक्त होईल अशी आशा वाटते. मी यांत जरूर अशा सुमारें ३० आधुनिक वाङ्मयप्रकारांचें विवेचन केलेलें आहे. कांहीं उणीव आढळल्यास तज्ञ मित्रांनीं जरूर कळवावें, अशी विनंति करून हे प्रास्ताविक निवेदन पुरे करतों.

२५९५

मु. भिलवडी, जि. सातारा
ता. १-जून १९४७
राजशक २७३

म. भा. भोसले.

# अनुक्रमणिका

## भाग पहिला, गद्य वाङ्मय


| | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| | विषयप्रवेश | १ |
| १ | निबंध | २ |
| २ | लघुनिबंध | ३ |
| ३ | प्रबंध | ७ |
| ४ | कादंबरी | ९ |
| ५ | लघुकथा | १५ |
| ६ | लघुतम कथा | २२ |
| ७ | रूपक-कथा | २४ |
| ८ | शब्दचित्र | २७ |
| ९ | विनोदी वाङ्मय | २९ |
| १० | नाटक-नाटिका | ३१ |
| ११ | नाट्यछटा | ३६ |
| १२ | चरित्र | ३८ |
| १३ | आत्मचरित्र | ४० |
| १४ | टीकावाङ्मय | ४१ |
| १५ | प्रवासवृत्त | ४३ |
| १६ | शास्त्रीय वाङ्मय | ४४ |
| | पत्र-वाङ्मय | ४४ |
| | ऐतिहासिक वाङ्मय | ४५ |
| | बालवाङ्मय | ४५ |


## भाग दुसरा, काव्यवाङ्मय


| | | |
|---|---|---|
| १ | जुनीनवी कविता | ४६ |
| २ | स्फुट कविता | ४७ |
| ३ | विडंबन काव्य | ४९ |
| ४ | जानपद गीतें | ५१ |
| ५ | सुनीत व सुनीता | ५२ |
| ६ | नाट्यगीत | ५४ |
| ७ | शाहिरी काव्य | ५६ |
| ८ | खंडकाव्य | ५८ |
| ९ | महाकाव्य | ६० |
| १० | मुक्तछंद | ६१ |

# आधुनिक वाङ्मयप्रकार

## विषयप्रवेश

समाजाला उपयोगी पडणारें जें जें लेखन तें तें सर्व वाङ्मय या शब्दांत समाविष्ट केलें जातें. ज्ञान होणें, माहिती मिळणें व करमणूक होणें अशा त्रिविध प्रकारांनीं तें माणसांच्या उपयोगी पडतें. वाङ्मयाची ही परंपरा फार जुन्या कालापासूनची आहे. रामायण, महाभारत हीं आपलीं प्राचीन काव्यें शेंकडों वर्षांपासून लोक वाचीत व ऐकत आले आहेत व अजुनीहि वाचतात आणि ऐकतात. यावरून वाङ्मयाचा जीवनावर किती प्रभाव पडलेला असतो, हें तुह्मांस कळून येईल.

पूर्वींच्या काळचें बहुतेक सर्व वाङ्मय काव्यामध्यें आहे. यामुळें तें लक्षांत ठेवण्यास सोयीचें होत असे. शिवाय छापण्याची कला त्यावेळीं नव्हती हेंही त्यास दुसरें कारण होतें. कितीतरी वाङ्मय, कहाण्या व गोष्टी यांच्या रूपानें परंपरेनें ह्मणजे बापानें मुलाला, मुलानें आपल्या मुलाला सांगायचें अशा पद्धतीनें चालत आलेलें आहे.

आजकाल छापण्याची कला अवगत झाल्यामुळें वाङ्मयाची झपाट्यानें वाढ होत आहे. गेल्या पन्नास वर्षांत अनेक नामवंत लेखकांनीं व कवींनीं अनेक गद्य व काव्यप्रकारांची वाङ्मयांत भर घातलेली आहे. निरनिराळ्या लेखनप्रकारांचीं तंत्रें व पद्धति यांमध्येंही कितीतरी विविधता आलेली आहे.

याशिवाय वाङ्मय हें जीवनाच्या निरनिराळ्या अनुभवांतून निर्माण होत असलें तरी आज तें जीवनाचें एक महत्त्वाचें अंग झालेलें आहे. उत्तम गुणांची शिकवण देणें, दुर्गुणापासून परावृत्त करणें आणि आजच्या जीवनकलहांत मनाची करमणूक करणें, असें वाङ्मयाचें त्रिविध कार्य आहे. राष्ट्राच्या जीवनांत तर वाङ्मयाचें कार्य बिनमोल आहे आणि ह्मणूनच

अशा वाङ्मयाची, त्याच्या लेखनप्रकारांची व रचनात्मक तंत्राची माहिती प्रत्येक जिज्ञासूला असणें अगत्याचें झालें आहे. शालेय अभ्यासक्रमांत या विषयाला भाषेमध्यें स्थान मिळालें असल्यानें " विद्यार्थ्यांना याची आवश्यकता आहे " हें निराळें सांगण्याचें कारणच राहिलेलें नाहीं.

वाङ्मयाचे मुख्य भाग दोन आहेत. एक **गद्य वाङ्मय** व दुसरा **काव्य वाङ्मय**. या प्रत्येकाचे पुन्हा अनेक पोटप्रकार प्रचलित आहेत. त्यांपैकीं जरूर अशा सर्व प्रकारांचें विवेचन पुढें क्रमानें केलेलें आहे.

# भाग १—गद्यवाङ्मय

## १ निबंध

निबंध हा एक जुना वाङ्मयप्रकार आहे. याच्या लेखनाची पद्धति ठराविक साच्याची आणि रुक्ष अशी आहे. शाळेंत मुलांना जे निबंध लिहावे लागतात, त्याच तऱ्हेची याचीही रचना असते. दारूबंदी, शेतकीसुधारणा, साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण वगैरे अनेक विषयांवर मोठे लेखक निबंध लिहित होते आणि अजूनही लिहितात. त्यांचे विषय सुख आणि शांति, समाजाची नीतिमत्ता, आर्थिक नियोजन, धर्मांचें कार्य असे अवघड किंवा यांपेक्षाही सोपे असे असूं शकतात. निबंधाला विषय कोणता घ्यावा याचें बंधन अजिबात नसतें. लेखकाच्या मनाला वाटेल त्या विषयावर तो निबंध लिहूं शकेल आणि तो जो विषय घेईल, त्याची सर्वसाधारणपणें सगळी माहिती तो त्या एका निबंधांत देईल.

असे निबंध विद्वान माणसेंच लिहित असत व ते वाचावयाला कंटाळवाणे, रुक्ष, बोजड भाषेचे आणि अनेक अवघड शब्द असलेले असे सामान्यतः असत. त्यामुळें सामान्य वाचक असले निबंध वाचावयाच्या भानगडींत सहसा पडत नाहींत. कारण लेखकानें निवडलेला विषय सोपा व लोकांच्या परिचयाचा असला, तरी लेखक आपल्या लेखनपद्धतीनें तो रुक्ष

व कंटाळवाणा करून ठेवी. पण ही स्थिति सध्यां पालटली आहे. आपण जें लिहूं तें विद्वान माणसाला तर कळलें पाहिजेच, पण सामान्य माणसांनाही तें समजलें पाहिजे, किंबहुना तें अधिकांत अधिक लोकांनीं वाचलें पाहिजे, तरच त्याचा उपयोग ! हें लेखकांना उमजलें आहे आणि त्या दृष्टीनें सर्व वाचकांना आवडेल असा एक निबंधाचा नवीन प्रकार रुढ झाला आहे. त्याचें नांव **लघुनिबंध.**

---

## २ लघुनिबंध

लघुनिबंध याचा अर्थ लहान निबंध असा होतो. पण तो लहान असतोच असें नाहीं. लघुनिबंध हें त्याचें रुढ झालेलें नांव आहे, इतकाच त्याचा अर्थ. कारण एकादा निबंध चार पानांचा असतो तर एकादा लघुनिबंध दहाबारा पानांचाही असूं शकतो. अर्थात 'लघु' याचा अर्थ येथें लहान असा घ्यायचा नाहींच मुळीं ! म्हणून त्याला 'ललितनिबंध' असेंहि म्हणतात आणि हेंच नांव अधिक योग्य आहे. ललित म्हणजे मधुर. जो वाचावासा वाटेल किंवा वाचतांना ज्यांत गोडी वाटेल, असा निबंध तो ललित निबंध अशी व्याख्या करावयाला कांहीं हरकत नाहीं.

निबंधाप्रमाणेंच ललित निबंधालाही विषय कोणता घ्यांवा याचें बंधन अजिबात नाहीं. लेखकाला वाटेल तो विषय तो घेऊं शकतो. मात्र निबंधाप्रमाणें तो त्या विषयांतील सर्व मुद्द्यांची सगळी माहिती कधींही देणार नाहीं. समजा 'आग' या विषयावर एकाद्यानें निबंध लिहिला तर, आग कशी लागते, आग कशी विझवावी आणि आग लागूं नये म्हणून काय सावधगिरी बाळगावी याची सविस्तर माहिती तो देईल. पण याच विषयावर ललित निबंध लिहिणारा लेखक काय करील पहा. तो प्रथम कुठल्या तरी आगीचें वर्णन करील. ती विझवायला सगळे लोक कसे धावून आले व कसा एकजुटीनें प्रयत्न करीत होते तें सांगेल आणि मग म्हणेल, "ही आग लोकांना दिसली अन् ते ती विझवावयाचा ताबडतोब प्रयत्न करूं लागले; पण देशाला आज पारतंत्र्याची केवढी मोठी आग लागलेली आहे,

दारिद्र्याची नि अज्ञानाची केवढी आग आज देशात पसरत आहे! या आगी लोकांना कधीं दिसणार! आणि त्या एकजुटीनें विझवावयाचा प्रयत्न तरी हे लोक केव्हां करणार!" अशा तऱ्हेनें एका विषयावर सुरवात करून त्याला धरूनच दुसऱ्या विषयाची माहिती, एकादें सुंदर तत्त्व किंवा उपदेश हीं ललित निबंधांत गोंवलेलीं असतात.

ललित निबंधाचें तंत्र अथवा पद्धति ठराविक अशी एकच नाहीं. प्रत्येक लेखकाची पद्धति निरनिराळी आहे, असेंच वाटतें. सुरवात कशी करावी किंवा शेवट कसा करावा याबद्दल कांहीं नियम नाहीं. पण प्रत्येक ललित निबंधांत खालील सामान्य गोष्टी मात्र आढळून येतात. (१) भाषा सुबोध, मनमोकळी आणि गमतीनें बोलल्यासारखी असते. (२) लेखक आपल्या आवडीनिवडी, लहरी, अनुभव, मित्राला सांगितल्याप्रमाणें मोकळेपणानें सांगत असतो. (३) इतर लोकांना सामान्य वाटणारा विषय घेऊनच त्यांत सौंदर्य किंवा महान् तत्त्व असल्याचें स्पष्ट केलेलें असतें.

प्रसिद्ध लघुनिबंधकार **अनंत काणेकर** यांचा खालील ललित निबंध वाचून पहा.

## पळण्याची कला

अगदीं लहानपणीं मी शाळेंत असतांना झालेली एक गोष्ट मला आठवते. त्यावेळीं मुंबईत होणारे क्रिकेटचे चौरंगी सामने फुकट पाहण्याची आम्हांला फार हौस. अर्थात फुकट पहाण्यांत जितका आनंद असतो तितकाच धोकाही असतो. पोलिस शिपाई येऊन किती वेळां हाकलुन काढील त्याचा नेम नाहीं! अशाच एका वेळीं त्या ठिकाणीं व्यवस्था ठेवण्याकरितां नेमलेला एक सोल्जर, आपल्या कुणालाही न समजणाऱ्या इंग्रजींत आमच्या अंगावर ओरडूं लागला. त्याला आमच्या एका वात्रट मित्रानें वेडावलें. त्यासरशीं एक शिवी हासडून त्या मित्राला पकडण्यासाठीं त्या सोल्जरनें झेप टाकली आणि आतां तो त्याची गचांडी पकडणार, इतक्यांत अशा कांहीं शिताफीनें आमचा मित्र त्याच्या हातांतून निसटला, कीं

आह्मी पाहतच राहिलों ! तो सोल्जर अधिकच चिडला आणि त्याचा पाठलाग करूं लागला. आमचा मित्र पुढें आणि तो सोल्जर मागें अशी साधारण अर्धा मैल प्रेक्षणीय शर्यत त्या मैदानांत चालली होती ! पण आमचा मित्र निसटला तो निसटलाच.

त्याचे जोडे, टोपी वगैरे जमा करून जेव्हां त्या वस्तु त्याला परत द्यावयाला आह्मी त्याच्या घरीं गेलों, तेव्हां तो मोठ्या विजयोत्सवानें हंसत हंसत आमच्यासमोर आला आणि, " कसा रे तूं जीव घेऊन पळालास ! " असें ह्मणून आह्मीं त्याला हंसण्यापूर्वी तोच आह्मांला सांगूं लागला ' काय ! कसा पळालोंय ! ' स्वतःच्या पळण्याची त्याला तारीफ करताना पाहून आह्मी थक्कच झालों !

पण खरोखर थक्क होण्यासारखें त्यांत कांहीं नव्हतें असें मला वाटतें. कारण पुढें पुढें जेव्हां महायुद्धाच्या बातम्या आह्मी वर्तमानपत्रांत वाचूं लागलों तेव्हां किती तरी वेळां आमच्या वाचण्यांत येई कीं अमक्या अमक्या सेनापतीनें आपल्या सैन्याला यशस्वी माघार घ्यावयाला लावली. एकादा वेडा सेनापती आपल्या सैन्यासहवर्तमान मागें पळाला कीं त्यानें यशस्वी माघार घेतली असें म्हणावयाचें; आणि आपल्या जिवासाठीं आमच्या मित्रानें धूम ठोकली तर त्याला मात्र पळपुट्या म्हणावयाचें ! माणसांचा स्वभावच असा आहे कीं जी गोष्ट लहान प्रमाणावर केली असता त्याना उपहासास्पद दिसते तीच मोठ्या प्रमाणावर पाहिली कीं त्यांना आश्चर्यकारक आणि प्रशंसनीय वाटते !

माझ्या मतें आमचा मित्र पळाला तेंच बरोबर. त्यावेळीं त्याला 'पळपुट्या' म्हणून आम्ही हंसलों हें खरें आहे. पण त्या हंसण्याचें कारण आमच्या शौर्याच्या कल्पना चुकीच्या होत्या म्हणून; त्यानें त्या सोल्जरशीं जर थोडी झटापट केली असती आणि दोनचार दांत किंवा आपला एकादा डोळा जर तो गमावून बसला असतां तर मोठा शूर वीर म्हणून आम्ही त्याचा गौरव केला असता. साहजिकच आहे; कारण स्वतःच्या केसालाही धक्का न लागतां सुरक्षित जागेवरून रक्तपात पाहण्याची हौस जर एकाद्यानें

फेडली तर शौर्यशाली वीराग्रणी म्हणून डोक्यावर घेऊन आम्ही त्याला कां नाचवूं नये ?

मला वाटतें बहुतेक माणसांना रक्तपात पाहण्याची थोडीबहुत हौस असते. कदाचित् फार पूर्वकाळीं मानवजात जेव्हां रानटी अवस्थेंत होती त्या काळच्या स्वभावाचा हा अवशेष असेल आणि म्हणूनच आमच्या शौर्याच्या कल्पना अजूनही थोड्याशा रानटी आहेत. नुसत्या शारीरिक बळाच्या जोरावर आपलें वर्चस्व स्थापण्याच्या अवस्थेंतून पुढें जाऊन मनुष्यानें मेंदूचा कितीतरी विकास केला आहे आणि मेंदूच्या जोरावर आपलें श्रेष्ठत्व स्थापण्याच्या अवस्थेला मनुष्य येऊन पोचलेला आहे, हें आपण पुष्कळ वेळां विसरतों. म्हणूनच लाइट ब्रिगेडमधल्या अवघ्या सहाशें लोकांनीं जेव्हां प्रचंड रशियन सेनेशीं बेफाम झुंज घेतली आणि त्यांतला प्रत्येक शिपाई मारला गेला, तेव्हां टेनिसन्सारखा महाकवीसुद्धां फसला ; आणि आपल्या काव्यांत त्या ब्रिगेडवर त्यानें स्तुतीचा वर्षाव केला. खरी गंमत अशी आहे, कीं त्या शिपायांना थोडीबहुत जर अक्कल असती, थोडा मेंदू जर त्यांनी वापरला असतां, तर भलत्याच मोठ्या सैन्याशीं झुंज घेण्याऐवजीं जीव घेऊन ते पळत सुटले असते. यालाच यशस्वी माघार म्हणतात. हेंच खरें शौर्य. नाहींतर भिंतीवर डोकें आपटून प्राण देणाऱ्याला वीरश्रेष्ठ कां म्हणूं नये ?

ज्याप्रमाणें काय बोलावें यापेक्षां काय बोलुं नये, हें ज्याला माहीत आहे, तो खरा वक्ता; काय लिहावें याहीपेक्षां काय लिहूं नये, हें ज्याला समजतें तोच खरा लेखक; त्याचप्रमाणें लढण्यापेक्षां पळण्याची कला ज्याला अवगत आहे तोच खरा शूर !

**अभ्यासः**—( १ ) पिकलीं पानें ( २ ) उघड्या खिडक्या ( अनंत काणेकर ) ( ३ ) सायंकाल ( ४ ) वायुलहरी ( ५ ) कल्पलता ( वि. स. खांडेकर ) ( ६ ) गुजगोष्टी ( ना. सी. फडके ) ( ७ ) कागदी होड्या ( बा. भ. बोरकर )

या पुस्तकांतील ललितनिबंध पहा. शिवाय मासिकांतून नेहमीं ललित-

निबंध प्रसिद्ध होत असतात, तेही वाचा.

प्रश्नः—( १ ) लघुनिबंधाला ललितनिबंध कां म्हणावें ? ( २ ) निबंध व ललितनिबंध यांत फरक काय ? ( ३ ) निबंध लोकप्रिय कां नव्हते ? ( ४ ) ललितनिबंधांत आढळणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या ? ( ५ ) ललितनिबंधाचे विषय कोणते ?

---

## ३ प्रबंध

मागें निबंधाची माहिती दिली. तो निबंध नी हा प्रबंध यांत फारच थोडा फरक आहे. समजा एकाच जातींचीं आंब्याचीं दोन झाडें आहेत ; मात्र एक लहान आहे नी दुसरें मोठें आहे. दोन्हीपासून आंबेच मिळतील. पण पहिल्यापासून मिळतील पाटीभर तर दुसऱ्यापासून मिळतील गाडीभर. निबंध नि प्रबंध यांत असाच फरक आहे. याशिवाय दुसरा महत्त्वाचा फरक असा कीं निबंध सामान्य विषयावरही लिहिला जातो. पण प्रबंध मात्र महत्त्वाच्या अशा मोठ्या विषयांवर लिहिला जातो.

प्रबंधाच्या तंत्राबद्दल एवढेंच सांगतां येईल, कीं जो विषय घेतला असेल, त्याचे सविस्तर मुद्दे पाडून त्या प्रत्येक मुद्द्यावर संगोपांग विवेचन करणें.

कुठल्याही विषयाचें सविस्तर ज्ञान मिळण्याच्या दृष्टीनें वाङ्मयांत प्रबंधाचें फार मोठें महत्त्व आहे. ‘धर्माचें कार्य’ ‘बेकारी’ ‘मानसोपचार’ ‘अस्पृश्यतानिवारण’ या महत्त्वाच्या विषयांवरचे चार सहा पानांचे निबंध वाचून कांहीं माहिती मिळते याबद्दल वाद नाहीं. पण याच विषयांवरचे प्रबंध वाचले तर कितीतरी पटीनें अधिक माहिती मिळते. ‘आजचे तरुण स्त्री-पुरुष व त्यांजपुढील प्रश्न’ या विषयावर प्रा. फडके यांनीं प्रबंध लिहिलेला आहे. या विषयाचीं त्यांनीं बारा प्रकरणें करून सुमारें पावणेदोनशें पानें विवेचन केलें आहे. याच विषयावर एखाद्यानें निबंध लिहिला तर तो वाचनीय होईल व त्यापासून माहितीही मिळेल. पण प्रबंधाइतकें सविस्तर विवेचन त्यात कधींही येणार नाहीं.

म्हणून महत्त्वाच्या नी गंभीर विषयांवर असे प्रबंधच लिहिले जातात आणि ज्ञानाच्या दृष्टीनें त्यांचें फार महत्त्व आहे. आचार्य जावडेकर यांच्या 'आधुनिक भारत' या प्रबंधांतील 'भारतीय सत्याग्रह-संग्राम' या प्रकरणांतील खालील परिच्छेद वाचा. म्हणजे मूळ प्रबंधाची कल्पना येईल.

'म. गांधींनीं १९२० च्या सप्टेंबरमध्यें राष्ट्रसभेपुढें आपली असहकार-युद्धाची योजना मांडिली तेव्हां हा कार्यक्रम अमलांत आणिल्यास एक वर्षांत आपणांस स्वराज्य मिळूं शकेल असें त्यांनीं बोलून दाखविलें होतें व त्यानंतर सुमारें दीड वर्षपर्यंत तो कार्यक्रम अमलांत आणण्यासाठीं त्यांनीं आपल्या प्रयत्नाची आपलें सर्व बौद्धिक व आत्मिक बल खर्चीं घालून शिकस्त केली. राष्ट्रानेंही त्या काळांत जेवढें आत्मिक बल त्यापाशीं होतें किंवा त्यावेळीं निर्माण होऊं शकलें तेवढें खर्च केलें; पण हें बल स्वराज्य-प्राप्तीस पुरें पडलें नाहीं. ही गोष्ट खरी असली तरी राष्ट्रसभेचा या मार्गावर कायमचा विश्वास बसावा आणि जी राष्ट्रसभा पूर्वी केवळ ठराव करणारी एक दुर्बळ संस्था होती, तिचें संपूर्ण परिवर्तन होऊन तिला वर्षभर अखंड कार्य करणाऱ्या व प्रस्थापित राज्यसत्तेशीं संघटित लढा करणाऱ्या संस्थेचें क्रांतिकारक स्वरूप प्राप्त व्हावें, हा चमत्कार कांहीं लहानसहान नव्हता. देशबंधु दास, पं. मोतीलाल नेहरू, बाबू राजेंद्रप्रसाद यांच्यासारख्या कायदेपंडितांनीं आपलें बुद्धिसर्वस्व व शक्तिसर्वस्व राष्ट्र-कार्याला वाहून घेण्यासाठीं फकिरी स्वीकारावी आणि शेंकडों सामान्य कायदेपंडितांनीं व तरुण उत्साही विद्यार्थ्यांनीं देशसेवेचें आजन्म व्रत अंगिकारावें ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हती.' पृ. ५३९.

**अभ्यास**— आधुनिक भारत (शं. द. जावडेकर), नीतिशास्त्रप्रवेश (कै. वा. म. जोशी), प्रतिभासाधन (ना. सी. फडके), स्वभावलेखन (पु. ग. सहस्त्रबुद्धे), विद्यार्थीधर्म (महादेवशास्त्री दिवेकर), विज्ञानबोध (श्री. म. माटे) हीं प्रबंधाचीं पुस्तकें पहा.

**प्रश्न**— (१) प्रबंध म्हणजे काय? (२) प्रबंध व निबंध यांत फरक काय? (३) प्रबंधाचें महत्त्व काय?

# ४ कथावाङ्मय–कादंबरी

कथावाङ्मयाची परंपरा फार जुनी आहे. अगदीं पुरातन काळापासून लोक कथावाङ्मय वाचीत नी ऐकीत आले आणि अजूनही लोकांच्या मनावरला त्याचा पगडा कमी होत नाहीं; उलट वाढतच आहे. पूर्वीच्या काळीं रामायण–महाभारतासारख्या देवादिकांच्या पौराणिक कथा आणि राजेरजवाड्यांच्या गोष्टी नी कहाण्या निर्माण झाल्या. त्यांनीं लोकांच्या मनाला इतका चटका लावला कीं, शेकडों वर्षें तें वाङ्मय वाचलें व ऐकलें जात आहे. पण जसजसें शिक्षण वाढत गेलें तसतसें देवादिकांच्या, अप्सरांच्या नी स्वर्गाच्या अद्भुत गोष्टींत माणसाचें मन रमेना. आपल्याचसारख्या हाडामांसाच्या, जमिनीवर वावरणाऱ्या नी कष्टानें किंवा सुखानें जगणाऱ्या माणसांच्या, त्यांच्यावर आलेल्या प्रसंगांच्या, त्यांच्या प्रेमाच्या, शौर्याच्या अगर साहसाच्या गोष्टी ऐकायला माणसें अधिक उत्सुक झालीं आणि त्याच दृष्टीनें आजचें विविध काल्पित कथावाङ्मय निर्माण झालें. त्यापैकीं कादंबरीचा प्रथम विचार करूं.

अमुक अमुक माणसें होतीं, त्यांच्यावर असे असे प्रसंग आले आणि त्यांतून तीं अशा प्रकारें बाहेर पडलीं किंवा त्यांचा असा शेवट झाला अशा पद्धतीनें अनेक माणसें आणि प्रसंग यांच्या साहाय्यानें कल्पनेनें रचून सांगितलेली मोठी गोष्ट म्हणजे कादंबरी. कर्जबाजारीपणा फार वाईट, त्यानें असें नुकसान होतें, सावकार फार क्रूर असतात, अशा प्रकारचा कुणी निबंध लिहिला तर त्याच्याकडे कुणी विशेष पहात नाहीं. पण याच विषयावर, धनाजी या नांवाचा शेतकरी होता, त्याच्यावर इतकें कर्ज होतें, सावकारानें त्याला असें नाडलें आणि शेवटीं धनाजीची अशा तऱ्हेनें वाताहत झाली, अशी कादंबरी लिहिली तर तिच्यावर मात्र वाचकांच्या उड्या पडतात. कादंबरीनें वाचकांची करमणूक होते. कादंबरींतल्या व्यक्तींच्या भावनांशीं तो एकरूप होतो आणि ज्या विषयावर कादंबरी असेल त्या विषयाचें त्याला ज्ञानही होतें. म्हणून कादंबरी हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय झालेला आहे.

मराठींतली पहिली कादंबरी ' मुक्तामाला ' या नांवाची लक्ष्मणशास्त्री हळबे यांनीं १८६१ सालीं लिहिली. त्यानंतर सुरवातीच्या या काळांत ज्या कादंबऱ्या निर्माण झाल्या त्यांच्यांत राजे, राण्या, सरदार, इनामदार हीं पात्रें आणि प्रेम हा एकच विषय रंगविलेला असे. लिहिण्याची पद्धतीहि गोष्टी सांगितल्याप्रमाणें ठराविक साचाची होती. त्यानंतर इतिहासांतल्या प्रसंगावर आधारलेल्या कांहीं कादंबऱ्या निर्माण झाल्या आणि १८९० चे सुमारास हरी नारायण आपटे यांनीं ' पण लक्षांत कोण घेतो ? ' ही कादंबरी लिहून सामाजिक कादंबऱ्या लिहिण्याची प्रथा सुरू केली. हरी नारायण आपटे यांनीं ऐतिहासिक व सामाजिक बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या आणि त्यानंतर कादंबरीची इतकी भरभराट झाली, कीं गेल्या पन्नास वर्षांत प्रेम, समाजसेवा, देशभक्ती, स्त्रीशिक्षण अशा नानाविध सामाजिक विषयांवर आणि समाजांतल्या सामान्य लोकांच्या जीवनावर शेंकडों कादंबऱ्या निर्माण झाल्या व त्यांच्या पद्धतींतही फार मोठा फरक पडला.

कादंबरींत मुख्य तीन गोष्टी असतात. ( १ ) नायक, नायिका व इतर व्यक्ति ( २ ) त्यांच्यावर येणारे किंवा घडणारे प्रसंग. ( ३ ) ते प्रसंग जिथें घडतील तीं ठिकाणें. यांतील व्यक्तींना किंबहुना प्रसंगांनाच अधिक महत्त्व आहे. हे प्रसंग क्रमानें सांगितले जात नाहींत. पुढें काय झालें हें कळण्यासाठीं वाचक आतुर होईल असे प्रसंग प्रथम सांगितले जातात. त्यानंतर वाचक अधिक बुचकळ्यांत पडेल किंवा जास्त आतुर होईल असे प्रसंग मधें सांगितले जातात आणि त्या सर्व गोष्टींचा उलगडा होईल असे प्रसंग शेवटीं सांगितलें जातात. एखाद्या माणसाचा खून झाला तर आपण तो माणूस अशा तऱ्हेनें वाईट वागत होता, त्यामुळें अमक्या व्यक्तीला राग आला आणि तिनें त्याचा खून केला असें सागूं; पण कादंबरीकार कसें सांगेल पहा ! तो प्रथम सांगेल, अमक्या व्यक्तीला त्या माणसाचा भयंकर राग आला. कां राग आला हें कळण्यासाठीं वाचक पुढें वाचील तर कादंबरीकार सांगेल, त्या व्यक्तीनें त्या माणसाचा खून केला. वाचक अधिकच विस्मयानें पुढें वाचील तेव्हां कादंबरीकार उलगडा करील, तो माणूस अशा प्रकारें वाईट तऱ्हेनें वागत होता, म्हणून त्याचा खून झाला. हेंच कादंबरीचें

१८८२३ मा.ग्रं. ८८ १०।८।५८

प्रमुख तंत्र सध्यां प्रचलित आहे.

'समरांगण' या कादंबरीचें उदाहरण घेतल्यास या तंत्राचा अधिक उलगडा होईल. बापूसाहेब सावकार नी गरिबांबद्दल सहानुभूति वाटणारा त्यांचा मुलगा भगवान यांचा लढा या कादंबरींत सांगितलेला आहे. सांगण्याची पद्धत पहा. भयंकर पावसानें नी नदीच्या पाण्यानें ज्यांच्या झोपड्या वाहून गेल्या आहेत अशा शेतकऱ्यांना भगवान आपल्या एका मोकळ्या वाड्यांत आणून ठेवतो व आपण मजुरांचा संप लढवायला मुंबईला जातो. शेतकऱ्यांचें तें वाड्यांत राहणें बापूसाहेबांना पसंत पडत नाहीं. ते संतापतात नी बाहेरच्या पावसांत व भयंकर अंधारांत सामानासकट त्या शेतकऱ्यांना ते हाकून काढतात. त्यामुळें बेभान होऊन शेतकऱ्यांतला हंबीर नांवाचा आततायी तरुण तो वाडाच पेटवून टाकतो. हें वर्णन प्रथमच्या कांहीं प्रकरणांत आहे. त्यानें वाचकांची आतुरता वाढते. आतां हे शेतकरी कुठें जाणार ? भगवानाशिवाय त्यांना कोण वाली ? तो आल्यावरच आतां काहींतरी होईल म्हणून वाचक पुढें वाचूं लागतो. भगवान मुंबईहून येतो. त्याची नी बापूसाहेबांची भयंकर खडाजंगी होते. शेवटीं बापूसाहेब भगवानच्या काड्कन मुस्कटांत देतात. कांहीं प्रतिकार न करता भगवान घराबाहेर पडतो. येथपर्यंत कादंबरी निम्यावर येते आणि वाचकही असा बुचकळ्यात पडतो, कीं सांगता सोय नाहीं. त्याला आश्चर्याचा धक्का बसतो. कारण जो शेतकऱ्यासाठीं कांहीं करील असें वाटत होतें, त्याच्यावरच घराबाहेर पडायची पाळी आली. मग आतां त्याचें नी त्या शेतकऱ्यांचें होणार तरी काय ? अशा काळजीनें तो पुढें वाचूं लागतो. त्याच्या काळजीचा उलगडा होण्यासारखे पुढील प्रसंग योजून कादंबरीचा शेवट केला आहे. अशा तऱ्हेनें वाचकाची आतुरता वाढविण्यासारखे प्रसंग योजून कादंबरीची रचना करतात.

याशिवाय कादंबरींत ज्या प्रमुख व्यक्ति असतील त्या वाचकांच्या डोळ्यापुढें स्पष्ट दिसण्यासाठीं त्यांचे स्वभाव, संवयी व स्वरूप यांचें वर्णन करावें लागतें. ज्या ठिकाणीं पसंग घडतील त्यांची माहिती सांगावी लागते व भाषा सोपी, ओघवती आणि संवाद सुटसुटीत व प्रत्यक्ष व्यवहारांत जसें

बोलतात तसे असावे लागतात. खालीं ' समरांगण ' कादंबरीतलें शेवटचें प्रकरण दिलें आहे. कादंबरीचा नायक भगवान हकिकत सांगत आहे. त्याच्या भावना, भाषा व संवाद पहा.

**भगवान—**

कितीही विचार केला तरी मनाची टोचणी कांहीं थांबत नाहीं. मुंबईला मी मजुरांचा संप लढविला अन् तो यशस्वी झाला तेव्हां आनंदानें नाचत सुटलों नुसता ! पण तो आनंद तर बाजूलाच राहिला; नुसतं साधं समाधान देखील माझ्या मनाला आतां वाटेना. या उपाशीं मरणाऱ्या लोकांसाठीं मी बापूंशीं लढा केला. तो लढा यशस्वी होऊन संपला. पण त्यांत बापूंचा बळी पडून तो संपायला नको होता, असं पुनःपुन्हा मला वाटतं !

या शेतकऱ्यांना आतां भरपूर खायला मिळेल. घरच्याप्रमाणें जमिनी पिकवितां येतील अन् राहण्यासाठीं घरंही बांधतां येतील, हें खरं; मला हेंच पाहिजे होतं. पण—पण, हें अशा प्रकारें मिळायला नको होतं !

बापूंचा विरोध सतत सहन करीत अन् त्या विरोधाला तोंड देत देत हें मिळायला हवं होतं !

या लोकांना बापू म्हणजे राक्षसासारखे वाटत होते. त्यांच्या मृत्यूनें कित्येकांना आनंदही झाला असेल ! पण रावजीबाबासारखे कितीतरी लोक त्यांच्यासाठीं धाय मोकलून रडत होते. रावजीबाबा तर अजून म्हणतो, ' कसाही असला तरी तो आमचा राजा होता! ' अन् त्यानें तसें म्हटलें कीं नळकत माझे डोळे पाण्यानें भरतात आणि माझ्या तरळत्या दृष्टी-पुढें बापूंचा तो रुबाबदार, करारी चेहरा दिसूं लागतो.

पण खरंच, मला दरडावणारा कां असेना पण बापूंचा चेहरा, आतां मला जन्मांत तरी बघायला मिळेल का ?

हा विचार मनांत आला, कीं मला हुंदका आवरत नाहीं. कुठंतरी जाऊन खूप खूप रडावंसं वाटतं !

या आठवड्यांत गांवांतील प्लेग अजिबात नाहींसा झाला. अन् गेल्या चार दिवसांत पावसानं तर अगदीं झोड उठविली आहे. सगळ्या जमिनींत हातहातभर ओली झाल्या.

उद्यां घात आली कीं पेरायला सुरवात होणार !

डॉक्टरनीं मला घरीं यायची परवानगी दिली होती. त्याप्रमाणें आज मी घरीं जाणार होतों.

सकाळींच आईकडून एक ताज्या वर्तमानपत्राचें कात्रण आलें. त्यांत सुरेंद्राची बातमी होती. अहमदाबादच्या दारू पिकेटिंगमध्यें त्यानें भाग घेतला होता आणि तिथं झालेल्या दंगलींत तो जखमी झाल्यामुळें त्याला तिथल्या हॉस्पिटलमध्यें ठेवलें होतें. ती बातमी वाचून मला आनंद झाला. त्याला आणण्यासाठीं उद्यांच जायचं मी ठरविलं.

नऊच्या सुमारास सगळ्या शेतकऱ्यांची सभा भरली. डॉक्टरनीं मला बोलायला उठविलं. मी बोलूं लागलों,

‘ आज तुमच्यापुढं बोलतांना मला एक प्रकारचा आनंद होतोय. पण केवढं तरी दुःख वाटतंय ! मला जें मिळवायचं होतं तें मिळालं म्हणून आनंद वाटतोय तर तें साध्य करतांना माझ्या बापूवर......’

माझा घसा दाटून आला. मला पुढचे शब्द उच्चारतां येईनात. ते सोडून मी म्हटलं, ‘ आतां घात आली कीं तुमच्याकडे असलेल्या जमिनी तुम्ही पेरून टाका. त्या जमिनी तुमच्याकडेच राहातील अन् ज्यांना जमिनी नसतील त्यांनीं तसं सागावं. फक्त सरकारी साऱ्याच्या अटीवर जमिनी दिल्या जातील ! ’

माझं बोलणं ऐकून सगळ्यांचे चेहरे फुलून गेले. त्यांच्या चेहऱ्यावरचा तो हंसरा आनंद मी आज पहिल्यानेंच पाहात होतों.

त्याच वेळीं माझी नजर सुभद्रेकडे गेली. तिचे डोळे पाण्यानें भरले होते. मी म्हटलं, ‘ सुभद्रा, हें काय ? ’

तिच्या तोंडून एकच शब्द निघाला, ‘ हंबीर ! ’

मीं सांगितलं, ‘ एक महिन्यांतच तो सुटेल ! ’

मी खुर्चीवरून उठून पद्मासह घरीं जायला निघालों. फाटकांतून बाहेर पडलों, तों समोर माई उभी होती. मला आश्चर्याचा धक्काच बसला ! मी एकदम उद्गारलों, ' माई ! '

' भगवान, मी एक मागणं मागायला आलेय ! '

' काय हवंय माईला ? '

' मरण ! गेल्या पंधरावीस दिवसांत मी जगाचे जे अनुभव घेतले त्यानें भांबावून गेलें आहें. जिकडे तिकडे राक्षस नि पशूच भरलेल्या त्या जगांत तडफडण्यापेक्षां तुझ्या हातून मरण आलं तरी तें पतकरावं म्हणून मी परत आलें ! '

' वेड्या आहांत माई तुम्ही ! मी अन् सुरेंद्र अशीं दोन मुलं तुम्हांला असतांना, तुम्हांला कोण मरूं देईल ? '

माईचा हात धरून मी घराकडे निघालों.

लांबूनच मला दरवाजा दिसला. महिन्यापूर्वींच या दरवाजांतून बापूंनीं मला बाहेर काढलं होतं; आणि आज ? बापूंना घराबाहेरच नव्हे तर जगाबाहेर काढून मी त्या दरवाजांत शिरणार होतों.

माझं हृदय आतल्याआंत गुदमरूं लागलं.

घराजवळ आलों. आई दरवाजांत वाट पाहातच उभी होती. पण तिचं तें पांढरं फटफटीत कपाळ बघून मला भडभडून आलं !

मला मिठी मारून तिनं ' भगवान ' म्हणून हंबरडा फोडला ! मला हुंदका आवरला नाहीं. माझा शोकावेग अनावर झाला. एकाद्या लहान मुलाप्रमाणें तिच्या गळां पडून मी रडूं लागलों !

---

**अभ्यास**—विषयाच्या दृष्टीनें कादंबऱ्यांचे दोन प्रकार पडतात.

[ १ ] ऐतिहासिक–उदा. स्वराज्यावरील संकट, उषःकाल, कादंबरीमय पेशवाई वगैरे. ( २ ) सामाजिक–उदा. दौलत, नवे संसार, सुखाचा शोध, गांवगुंड, अपुरा डाव.

[ २ ] लेखनाच्या दृष्टीनें कादंबऱ्यांचे चार प्रकार पडतात.

( १ ) लेखकानें सगळे प्रसंग वर्णन करून सांगितलेल्या वर्णनात्मक

उदा.—अटकेपार ( ना. सी. फडके ); ( २ ) कादंबरींतील एकादी प्रमुख व्यक्ति आपल्या जीवनांतले प्रसंग स्वतः सांगत आहे, अशा कल्पनेनें लिहिलेल्या आत्मवृत्तात्मक-उदा.—उल्का ( वि. स. खांडेकर ); ( ३ ) कादंबरींतल्या अनेक व्यक्ति आपापली हकिकत सांगतात या कल्पनेनें लिहिलेल्या अनेक व्यक्तींच्या आत्मवृत्तात्मक. उदा.—समरांगण ( म. भा. भोसले ); ( ४ ) कादंबरींतल्या अनेक व्यक्तींचीं प्रसंगाच्या क्रमानें नुसतीं पत्रेंच देऊन रचलेल्या पत्रात्मक. उदा.—इंदू काळे व सरला भोळे ( कै. वा. म. जोशी. )

[ ३ ] प्रमुख कादंबरीकाराच्या प्रमुख कादंबऱ्या ( १ ) वि. स. खांडेकर ( हिरवा चांफा, दोन ध्रुव ) ( २ ) ना. सी. फडके (उद्धार, प्रतिज्ञा ) ( ३ ) ग. त्र्यं. माडखोलकर (नवे संसार, मुक्तात्मा ) ( ४ ) भा. वि. वरेरकर ( धावता धोटा, विधवा कुमारी, ( ५ ) र. वा. दिघे ( पाणकळा, सराई ) ( ६ ) साने गुरूजी ( शामची आई, पुनर्जन्म ) ( ७ ) द. र. कवठेकर ( अपुरा डाव, आभाळाची सावली )

प्रश्न— ( १ ) कादंबरींतील मुख्य गोष्टी कोणत्या ? ( २ ) कादंबरी म्हणजे काय ? ( ३ ) कादंबरीचें प्रचलित तंत्र कोणतें ? ( ४ ) अगदीं प्रथमच्या कादंबऱ्यांतून कोणता विषय असे ? ( ५ ) विषयाच्या दृष्टीनें कादंबऱ्यांचे प्रकार कोणते ?

---

## ५ लघुकथा

लघुकथा म्हणजे लहान गोष्ट. कमी व्यक्तींच्या व कमी प्रसंगांच्या साह्यानें वाचकाच्या मनावर एकाच भावनेचा, विचाराचा किंवा प्रसंगाचा परिणाम करणें हें लघुकथेचें मुख्य ध्येय आहे. आपण गरिबांच्या जीवनावरची एकादी कादंबरी वाचली तर आपल्या डोळ्यापुढें तिच्यांतल्या अनेक व्यक्ति आणि त्यांना सहन करावीं लागणारीं नानाविध दुःखें उभीं राहतील. पण त्याच जीवनावरची लघुकथा वाचली तर एकादीच व्यक्ति अन् तिला जाचक झालेलें गरिबांचें एकादेंच दुःख आपणांला दिसेल

आणि असा परिणाम जिचा होतो तीच खरी लघुकथा. या दृष्टीनें एखादी विचित्र किंवा असामान्य व्यक्ति, प्रेम, राग, लोभ, हेवा, भीति वगैरे विकार उत्पन्न करणारे प्रसंग आणि मनाला चटका लावणारें समाजांतलें कुठलेंही दृश्य, हे लघुकथेचे विषय होऊं शकतात.

माणसांचें जीवन हें सुखदुःखाच्या नानाविध प्रसंगांनीं आणि घटनांनीं भरलेलें आहे. विष्णुपंत या नांवाचे एक सज्जन गृहस्थ होते. त्यांनीं प्रामाणिकपणानें नोकरी केली व ते सुखानें जगले किंवा दिनकरचें आपल्या शेजारीं राहणाऱ्या कुमुदवर प्रेम बसलें. कुमुदनें आपल्या बापाला विचारलें. त्यानें परवानगी दिली व लग्न करून तीं दोघें आनंदानें राहूं लागलीं. समाजांत असें सहसा घडत नाहीं, अन् क्वचित घडलें तर त्यावर लघुकथा कधींहि होणार नाहीं. कारण यांच्या जीवनांत सांगण्यासारखें कांहीं नाहीं. तेंच जर, विष्णुपंत सज्जन नी सालस होते, पण एके दिवशीं त्यांच्यावर चोरीचा आळ आला आणि त्यांना अटक झाली किंवा दिनकरचें कुमुदवर प्रेम बसलें, पण त्यांच्या लग्नाला वडील माणसांचा विरोध होता, अशा तऱ्हेनें विरोध, पेचप्रसंग अथवा गुंतागुंत असल्याशिवाय किंवा निर्माण केल्याशिवाय लघुकथा होत नाहीं.

कादंबरीप्रमाणेंच वाचकांची आतुरता वाढेल अशा प्रकारें लघुकथेची रचना करतात. विष्णुपंतांच्या उदाहरणानें हें सांगणें सोपें होईल. तें असें:—

लघुकथेच्या सुरवातीला विष्णुपंतांच्या सज्जनपणाचा एक लहानसा प्रसंग लिहून ते फार सज्जन होते, असा त्यांचा परिचय करून दिला जाईल. मधल्या भागांत चोरीचा त्यांच्यावर आळ आला हें सांगितलें जाईल आणि शेवटीं ते अशा तऱ्हेनें सुटले किंवा अडकले याचा उलगडा केला जाईल. यांत शेवटच्या भागाला जास्त महत्त्व आहे. लेखकानें विष्णुपंताची सुटका न करतां प्रसंगानें त्यांना शिक्षा झाल्याचें दाखविलें तर कांहीं अपराध नसतां सज्जनाला शिक्षा होते या कल्पनेनें वाचक हळहळेल. वाचकाच्या मनावर असा परिणाम करणारी कथा तंत्रदृष्टीनें यशस्वी होय. कारण वाचकाच्या मनावर प्रसंगाचा किंवा विचाराचा परिणाम करणें हा लघुकथेचा मुख्य

हेतु असतो. म्हणून मनाला चटका लावणारी आकर्षक सुरवात, आतुरता वाढविणारा गुंतागुंतीचा मध्यभाग व शेवटीं परिणामकारी उलगडा अशा क्रमानें लघुकथा लिहिल्या जातात. अशा तंत्रानें लिहिलेली खालील लघुकथा वाचा.

---

## शेवटचा क्षण

### ( १ )

अस्पृश्यांचे महान पुढारी श्रीयुत धर्मदास व्यासपीठावर चढले अन् समोर जमलेल्या अफाट जनसमूहाकडे बघून त्यांना केवढातरी आनंद वाटला. चारच दिवसांपूर्वी आपण धर्मांतराची घोषणा करतों काय? अन् त्याला पाठिंबा देण्यासाठीं आज या ठिकाणीं हजारों अस्पृश्य जमतात काय! त्यांचा त्यांनाच अभिमान वाटला. कोणत्याच पुढाऱ्याला शक्य झालं नाहीं, असं प्रचंड कार्य आज आपल्या हातून होणार! अन्यायाचा प्रतिकार आपण कृतीनें करून दाखविणार. आज हें धर्मांतर झालें तर जगाच्या क्रांतीच्या इतिहासांत हा दिवस सुवर्णाक्षरांनीं लिहिला जाईल अन् त्याचं सारं श्रेय आपल्या नांवाकडे येईल! त्यांचें तनमन उत्फुल्ल झालें आणि त्याच अभिनिवेशांत ते बोलूं लागले, "बंधूंनो, हिंदूंना शेवटचा मुजरा करण्यासाठीं आज आपण या ठिकाणीं जमलों आहोंत. ही घटना मागं न झालेली अन् पुढंहि न होणारी अशी असली तरी विचित्र खास नाहीं. जिवंत माणसांच्या जीवनांत असल्या घटना हमेश घडायच्याच! या प्रसंगीं आपणांला दुःख आणि आनंद दोन्हीही वाटणं साहाजिक आहे. पण मी म्हणतों या वेळीं आपणांला आनंदच अधिक वाटावा! ज्या हिंदू धर्मानं आपणांला पांचहजार वर्षं पायाखालीं तुडवलं, कोल्ह्याकुत्र्याच्या किंमतीनं जगवलं आणि 'अस्पृश्य' म्हणून नरकांतल्या किड्याप्रमाणें कुजविलं, त्या धर्माचा त्याग करण्यांत कसलं दुःख? (टाळ्या) कष्टानं मरणाऱ्या अस्पृश्यांना लाथ आणि ऐतगब्बू जगणाऱ्या ब्राह्मणाला हात! हेंच ज्या धर्माचें तत्त्व, त्या धर्मांत यापुढें क्षणभरही राहातां उपयोगी नाहीं. अशा अन्यायी, जुलमी धर्मांतून सुटण्याची ही घटिका

खरोखरच किती आनंददायी ! ( टाळ्या ). चार दिवसांपूर्वी आपण धर्मांतराची घोषणा केली. हिंदूंमधें केवढी तरी खळबळ उडाली त्यामुळें. अनेक पुढारी आपणांकडे आले. धर्मांतर न करण्याबद्दल त्यांनीं परोपरीनें विनविलें. पण त्यांच्या विनाविण्याची आतां आपणांला फिकिर नाहीं. अन्यायी हिंदुधर्माच्या तिरस्कारामुळें कशालाच न जुमानतां त्या धर्मावर सूड घेण्यासाठीं आपण उत्साहानें या ठिकाणीं जमलांत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. बंधूंनो, कोळसा उगाळण्यांत अर्थ नाहीं. हिंदु धर्माला शेवटचा मुजरा करतांना त्याच्या अन्यायाची पुनरुक्ति करण्यांत कांहींच लाभ नाहीं. आतां वेळ न लावतां उठा, अन् आपले प्रेमळ बाहू पसरून आपणांला हृदयाशीं कवटाळण्यासाठीं उभ्या असलेल्या या ( खिस्ती मिशनऱ्यांकडे बोट दाखवून ) खिश्चन धर्माला मिठी मारा ! "

( २ )

सगळी सभा स्तब्ध झाली. कोणीच उठलें नाहीं. धर्मदासांना मोठें नवल वाटलें. इतके दिवस आपल्या वाटेल त्या शब्दाला मान तुकविणाऱ्या या लोकांना आज झालं तरी काय ? ते पुन्हा म्हणाले, ' हं, उठा, उठा लवकर ! '

तरीहि कोणीच उठेना. ते अडाणी जीव केविलवाण्या नजरेनें एकमेकांकडे बघूं लागले. तें पाहून धर्मदासांना त्वेष चढला. ते रागानें म्हणाले, ' अरे, इतक्या दिवसांचा तुमचा सारा उत्साह या क्षणीं जळाला कीं काय ? क्रांतीच्या या शेवटच्या क्षणीं जर तुम्ही असे गारठून गेलांत तर या अन्यायी जगांत तुम्हांला जागा देखील मिळायची नाहीं ! '

सोसाट्याच्या वाऱ्यांत वीज कडकडावी तसें कोपऱ्यांतून कुणीतरी बोललें, ' आमची हिंदु धर्मांतली जागा कांहीं हिसकावून घेणार नाहीं कोणी ! '

' हिसकावून घेत नसले तरी ती आपणच भिरकावून दिली पाहिजे ! शौचकूपांत परसाकडं बसायचं असतं ! पण तेथें ताट घेऊन जेवायला बसायचा वेडेपणा कुणीच करणार नाहीं तुमच्यासारखा ! ' त्या कोप-

त्यालाच उद्देशून धर्मदास बोलले. त्यांच्या आंगाची लाही होत होती. यापूर्वी कितीतरी सभा झाल्या, हिंदुधर्मावर कोरडे ओढणारीं त्यांचीं भाषणेंही थोडीं झालीं नव्हतीं ? त्या कोठल्याच प्रसंगीं त्यांना विरोध झाला नव्हता अन् कुठं थोडासा झाला तरी सगळी सभा त्या विरोधकां-वर माणुसकी सोडून तुटून पडे. त्याच माणसांनीं हा आजचा विरोध मुकाट्यानें ऐकून घ्यावा ! त्यांचें मस्तक भणभणूं लागलें. डोळे लाल करून आणि टेबलावर मुठी आपटून ते म्हणाले, 'आज आपणांस हिंदु धर्माचा त्याग करायचा आहे. ख्रिस्ती धर्म स्वीकारायचा आहे. बोला, येशू ख्रिस्त की जय !'

सभेंत एकाच्याही तोंडून तो शब्द निघाला नाहीं. धर्मदास पुन्हा ओरडले, 'येशू ख्रिस्त की...!'

'हिन्दुधर्म की जय !' सगळ्या सभेचा आवाज घुमला.

कानांत अग्निरस पडावा, तसें झालं धर्मदासांना. त्यांनीं कान घट्ट दाबून धरले. तो आवाज बंद होतांच गंभीर आवाजांत ते म्हणाले, 'जातीवर गेलांत सारेजण. नालायक हिन्दुधर्म आणि अस्पृश्य म्हणजे त्याच्यापेक्षांही नालायक; त्याचीच अवलाद ! त्याच जुलमी धर्मांत तुम्ही कुजून मरा. पण यापुढें त्या हिन्दुधर्मांत क्षणभरही रहायला मी तयार नाहीं. हा पहा मी तुमच्यासमोर बाप्तिस्मा घेतों.'

( ३ )

म्हणून ते त्या मिशनऱ्याकडे वळले. आतां काय करावं, या विवंचनेंत सगळी सभा स्तब्ध झाली. इतक्यांत एक म्हातारा गृहस्थ धांवतच स्टेज-वर गेला आणि रडत रडत म्हणाला, 'धर्मदास, काय करतां हें ? धर्म-दासांनीं धर्मसेवा करायची असते !'

'पण सेवा करायला धर्म नको का ? त्यासाठीं तर मी धर्म स्वीका-रतोंय हा !'

'आपला हिंदुधर्म...!'

'जाळी तुमचा हिंदुधर्म ! त्याला डोक्यावर घ्या !! अन् त्याच्या-

खाली चिरडून मरा!!!'

'नाहीं. हिंदु धर्म दयाळू आहे.'

'स्वतःच्या लोकांना लाथा देणाऱ्या धर्माला कोण दयाळू म्हणेल? हिंदुधर्म निष्ठुर आहे अन् तुम्हांला सांगतों, (सगळ्या सभेला उद्देशून) असे रडत बसूं नका. अजुनी उठा. निष्ठुर व्हा, कठोर व्हा, हिंदुधर्मावर सूड घ्या.'

कांहीं लोक उठूं पाहात होते, तोंच तो म्हातारा म्हणाला, 'धर्मदास, दुष्मनावर निष्ठुर होतां येतं, शत्रूवर सूड घेतां येतो. पण हिंदुधर्म आपला दुष्मन नाहीं. हिंदुधर्म आपला शत्रु नाहीं. हिंदुधर्म आपला मायबाप आहे.' (टाळ्यांचा कडकडाट अन् हिंदुधर्माचा जयजयकार एकदमच झाला!) परधर्माच्या पुष्पशय्येपेक्षां ज्या धर्मानं आपणांला जन्म दिला, खायला घातलं नि सांभाळ केला, त्या धर्माला लाथ दिल्यावर जगांतला कोणता धर्म आम्हांला हात देऊं शकेल? धर्मदास, हिंदुधर्माच्या अन्यायाबद्दल तुम्ही कितीहि बोला. धर्मांतराच्या घोषणा वाटेल त्या आवेशानें करा. टाळ्यांची साथ करून आम्ही तें ऐकायला तयार आहोंत. पण प्रत्यक्षच हिंदुधर्माचा दरवाजा ओलांडून बाहेर पडायला ज्या वेळीं तुम्ही सांगाल, त्या वेळीं हिंदुधर्माच्या थोरवीनं दिपलेलं आमचं हृदय 'होय' म्हणणार नाहीं; 'नाहीं' म्हणणार नाहीं!'

'हिंदुधर्म दगडासारखा कठीण नाहीं. फुलासारखा मृदुही नाहीं. तो बर्फासारखा आहे! प्रसंगीं त्यावर डोकं आपटून खोक फुटेल तर प्रसंगीं त्याच्या अथांग जलांत स्वैर डुंबतांही येईल! बोला धर्मदास, अशा धर्मावर सूड कसा घ्यायचा?'

'सूड! सूड नेभळटांना घेतां येत नाहीं. तुमच्यासारख्या नालायकांना तर कधींच नाहीं. हा पहा मीच तुम्हांला सूड घेऊन दाखवितों.'

म्हणून त्यांनीं बाप्तिस्मा घ्यायची तयारी केली. तेव्हां लोकांनीं त्यांना अडवून विचारलं, 'तुम्ही कोणावर सूड घेणार?'

'हिंदुधर्मावर.'

' म्हणजे आमच्यावर ? '

' हो ! '

' पण आम्ही घेऊं देणार नाहीं. '

' कां घेऊं देणार नाहीं ? प्राण गेला तरी बेहेत्तर आहे; पण मी हिंदु-धर्मात रहाणार नाहीं ! '

' आम्ही असे घट्ट पकडून ठेवूं. '

म्हणून धर्मदासांना लोकांनीं खांद्यावर घेतलें. तेथून लगेच त्या मिरवणुकीची हकालपट्टी झाली आणि धर्मांतरासाठीं जमलेली ती हजारों अस्पृश्यांची सभा शेवटच्या क्षणाला धर्मांतर न करतांच आपल्या पुढाऱ्यासह हिंदुधर्माचाच जयजयकार करीत विलीन पावली आणि त्या अघटित घटनेबद्दल तो दिवस हिंदु धर्माच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिला गेला !

---

**अभ्यास**—( १ ) लेखनाच्या दृष्टीनें लघुकथेचे पुढील प्रकार पडतात. १ वर्णनात्मक—कडू साखर ( ग. ल. ठोकळ ), २ आत्मवृत्तात्मक—दारूबंदी ( ना. सि. फडके ), ३ पत्रात्मक—हवापालट ( वि. स. खांडेकर ).

( २ ) विषयाच्या दृष्टीनें लघुकथेचे अनेक प्रकार संभवतात. पण सामान्यतः खालील सहा प्रकारांत हल्लींच्या लघुकथा लिहिल्या जातात:—

( अ ) ज्या कथेंत व्यक्तींना जास्त महत्त्व आहे अशी **व्यक्तिप्रधान कथा.**

( ब ) जिच्यामध्यें प्रसंगांना जास्त महत्त्व आहे अशी **प्रसंगप्रधान कथा.**

( क ) जी एकाद्या तत्त्वाला धरून लिहिली जाते ती **तत्त्वप्रधान कथा.**

( ड ) जी प्रेमविषयावर असते ती **प्रेमकथा.**

( ई ) जी खेड्यांतील लोकांच्या जीवनावर असते ती **ग्रामीणकथा.**

( फ ) जी खऱ्या घडलेल्या प्रसंगावर असेल ती **सत्यकथा.** या सत्यकथेंत खरीं नांवें आणि ठिकाणें बदललेलीं असतात.

( ३ ) मासिकांतून व साप्ताहिकांतून दरमहा शेंकडों लघुकथा प्रसिद्ध होत असतात. शिवाय पुढील कथासंग्रह पहा. पूजन, ऊन पाऊस, पहिली लाट, पाकळ्या, ( वि. स. खांडेकर ), कडूसाखर, सुगंध, ( ग. ल. ठोकळ ), पूर्तता, ताजमहाल, ( र. वा. दिघे ), पुनर्भेट भाग १ ते ६ ( य. गो. जोशी ), प्रो. फडके यांच्या गोष्टी, भाग १।२ व उल्हासकथा, कल्पवृक्षांच्या छायेंत, सागराच्या लाटा ( लक्ष्मणराव सरदेसाई ).

प्रश्न—( १ ) लघुकथेचा हेतु काय ? ( २ ) तिचे विषय कोणते ? (३) लघुकथेचें तंत्र कसें असतें ? (४) लेखनाच्या दृष्टीनें लघुकथेचे प्रकार कोणते ? (५) तुमच्या वाचनांतील कथांचें विषयवार वर्गीकरण करा.

---

## ६ लघुतम कथा

लघुतमकथा हा नांवाप्रमाणेंच आकारमानानें लहान पण अगदीं नवीन लेखनप्रकार आहे. आतांपर्यंत अनेक लेखकांनीं लघुतम कथा लिहिलेल्या आहेत. प्रो. भा. म. गोरे यांनीं या प्रकाराला अधिक हातभार लावलेला आहे. त्यांनीं आपल्या लघुतम कथांचा 'पालवी' या नांवाचा संग्रह प्रसिद्ध केला आणि महाराष्ट्रांतल्या बहुतेक सर्व लेखकांची एकेक लघुतमकथा घेऊन त्यांचा "नवें निशाण" या नांवाचा एकत्रित संग्रह प्रसिद्ध केला. मासिकाच्या संपादकांना अगदीं थोड्या जागेंत छापावयाला आणि वाचकांना अगदीं थोड्या वेळांत वाचून टाकावयाला हा लेखनप्रकार आतिशय सोयीचा आहे.

लघुकथा व लघुतम कथा यांच्या स्वरूपांत फार थोडा फरक आहे. एक थोरली व एक लहान अशा दोन बहिणी असल्या तर त्यांच्या शरीराच्या वाढींतच आपणाला जास्त व कमी असा फरक दिसेल. कदाचित् लहान बहीण जरा अवखळ दिसेल. एवढाच फरक या दोन कथांमध्यें आहे. लघुकथेप्रमाणें लघुतम कथेलाही कांहीं व्यक्ति आणि एक प्रसंग असावा लागतो. तसेंच तिचा शेवटही वाचकांच्या मनावर परिणाम करणारा असाच व्हावा लागतो. लघुकथेचें सर्व तंत्र असलेली अशी मराठींतली सर्वांत लहान अशी आचार्य अत्रे यांनीं सांगितलेली पुढील लघुतम कथा पाहा.

" ती पुढें चालली होती.
तो तिच्या मागून जात होता.
तो खाकरला.
तिनें मागें वळून पाहिलें.
ती त्याची बहीण होती.
—तो मूर्छित पडला ! "

या सहा वाक्यांत लघुतम कथेचें सर्व तंत्र आहे. प्रथम एक प्रसंग; त्या प्रसंगांत सांपडलेल्या व्यक्तींची हकीकत आणि शेवट मात्र असा कीं, एकदम वाचकांच्या मनाला धक्का बसावा किंवा तो चकीत व्हावा. थोड्या मजकुराची ही कथा असल्यामुळें शेवट असा एकदम कलाटणीचा किंवा मनाला धक्का देणारा केल्याशिवाय वाचकाच्या मनावर तिचा परिणाम होत नाहीं आणि तसा परिणाम करणें हें तर लघुतमकथेचें मुख्य लक्षण आहे. मात्र हा शेवट भलताच असतां उपयोगी नाहीं. तर तो कथानकाला साजेल असा आणि व्यवहारांत घडलेला नसला तरी घडूं शकेल असा असला पाहिजे. पुढील कथा या तंत्राला धरून वाचा.

## क्रूर जात ! (म. भा. भोसले)

माडीवरच्या दिवाणखान्यांत बसून बापूसाहेबांचें आपल्या चार मित्रांसमोर प्रवचन सुरू झालें होतें. " मुसलमानांइतकी क्रूर जात जगांत दुसरी कोणतीच सांपडायची नाहीं, हें आतां तरी तुम्हांला पटलें कीं नाहीं ! इतिहासांतले दाखले बघायचें आतां कारणच नाहीं. नुसत्या कलकत्त्याकडे दृष्टिक्षेप केला तरी प्रत्येक हिंदूचे डोळे खाडकन् उघडतील—नव्हे उघडले आहेत ! अर्भकांना फरशीवर आपटणें, खिळे ठोकणें, असहाय माणसांना आगींत फेकणें, हातपाय तोडून हालहाल करून मारणें, हीं काय माणसांचीं कृत्यें ? राक्षसदेखील असले प्रकार कधीं करायचे नाहींत ! याला उपाय—सावरकर, तप झालें ओरडत आहेत, कीं संघटना वाढवा ! शौर्य कमवा, ठोशास ठोसा दिल्याशिवाय मुसलमान वठणीवर यावयाचे नाहींत. बस, आपलं ठरलं, यापुढें कुठल्याही मुसलमानाला दारांत उभा राहूं द्यायचा

नाहीं आणि प्रसंग पडेल तिथें त्याला ठेचायला कमी करायचं नाहीं—"

तोंच खालून त्यांच्या आईची हांक आली, "बापू, अरे बापू !"

"काय, आई ?"

"खालीं ये लवकर !'

प्रवचन बंद करून ते खालीं आले. तों सोप्यांत रहिमान मुलाणी उभा, अन् त्याला त्यांची आई म्हणत होती, 'फराळ केल्याशिवाय नी चहा घेतल्याशिवाय जाऊं नकोस !' बापूसाहेब स्तंभित झाले. त्यांनीं तिरस्कारानें आईकडे व रहिमानकडे पाहिलें. त्यांची आई म्हणाली, 'याला वर घेऊन जा. फराळाला घातल्याशिवाय त्याला सोडायचं नाहीं !'

"म्हणजे ?" आश्चर्यानें त्यांनीं विचारलें.

"अरे, आपल्या राजाला काळदाढेंतून ओढून काढणारा हा देवदूत आहे, मुसलमान नाहीं ! पाणी बघायला गेलेला आपला बाळ पाय निसरून पडला नी वहावटीला लागला. हा मासे धरीत होता. चटकन् त्यानें उडी मारली, राजाला वर काढलें, अन् इकडे घरीं घेऊन आला."

बापूसाहेबांना पुढें ऐकायची जरूरच वाटली नाहीं. ते कडकडून रहिमानला भेटले अन् त्याला वर घेऊन गेले. त्याला पहातांच त्यांच्या मित्रांचीं तोंडें उकललेल्या शेंदाडाप्रमाणें वासलीं !!

**अभ्यास**—'नवी पालवी,' 'नवें निशाण' यांतील लघुतम कथा वाचा.

**प्रश्न**—(१) लघुतम कथेंत कलाटणीचें महत्त्व कां ? (२) कलाटणी कशी असावी ? (३) लघुतम कथेची पद्धति कशी ?

---

## ७ रूपक-कथा

रूपककथा ही आकारानें लघुतमकथेएवढीच असते. पण रूपककथा हा नवीन लेखनप्रकार नाहीं. ही फार जुनी आणि लोकप्रिय अशी लेखन-पद्धति आहे. हितोपदेश व इसापनीति यांत कोल्हा, सिंह, हत्ती, माकड यांच्या ज्या गोष्टी आहेत, त्या सगळ्या रूपककथाच आहेत. त्या इतर प्राण्यांच्या जीवनावर जरी सांगितलेल्या असल्या तरी माणसाच्या स्वभा-

वाला व गुणदोषांना त्या बरोबर लागू पडतात.

'लेकी बोले सुने लागे' या म्हणीप्रमाणें किंवा अन्योक्ति या अलंकाराचें जें काम, तेंच रूपककथाही करते. ही कथा इतर प्राण्याच्या जीवनावर किंवा सृष्टींतल्या कुठल्याही वस्तूवर लिहिलेली असेल. पण तें सर्व लिहिणें आमच्या समाजाला, माणसांच्या स्वभावाला किंवा गुणदोषाला बरोबर लागूं पडेल. उदा. उंदीर–सिंहांची गोष्ट तुम्हांस माहीत आहे. उंदीर एका सिंहाच्या हातांत सांपडतो. तो गयावया करतो, म्हणून सिंह त्याला सोडून देतो. पुढें सिंह एका जाळ्यांत सांपडतो. मागचा उपकार जाणून उंदीर तें जाळें कुरतडून सिंहाला सोडवितो. पण अशीं उपकार जाणणारीं माणसें जगांत फार थोडीं. उलट उपकारकर्त्यावर अपकार करणारींच फार. तें दाखविण्यासाठीं याच कथेची खालीलप्रमाणें रूपककथा अँब्रूज बायर्सनें तयार केली.

"एका सिंहाच्या पंजांत एक उंदीर सांपडला. सिंह त्याला मारणार, तोंच तो उंदीर म्हणाला, 'महाराज, मला जीवदान द्या. मी तुमचे उपकार केव्हांही फेडीन!' सिंहानें उंदरास सोडलें.

"पुढें कांहीं दिवसांनीं पारध्यांनीं लावून ठेवलेल्या जाळ्यांत सिंह सांपडला. त्याला हातपाय हालवितां येत नव्हते. तें त्या उंदरानें पाहिलें. धांवत जाऊन त्यानें सिंहाचें शेपूट कातरलें आणि तो पळून गेला."

उपकारकर्त्यावर अपकार करण्याची कांहीं माणसांची जी वृत्ति असते, ती वरीलप्रमाणें रूपककथेंत दाखवितां येते.

"मानवी सृष्टीला लागू पडणारा, मोजक्या शब्दांत सांगितलेला एक प्रसंग" रूपककथेच्या रचनेबाबत एवढेंच सांगतां येईल. खालील रूपककथा वाचा. सदर कथेंत वैभवाच्या धुंदीनें भावाला भाऊ कसा विसरतो किंवा वैरी होतो हें सुंदर तऱ्हेनें दाखविलें आहे आणि शेवटीं सामान्य दलित वर्ग जर खवळला तर वैभवाची कशी राखरांगोळी करील हें उत्कृष्ट तऱ्हेनें सूचित केलें आहे.

### दोन दगड ( म. भा. भोसले )

एकाच खाणमातेच्या पोटीं जन्म घेतलेले ते दोघे सख्खे भाऊ होते.

खाणींतून काढून त्यांना वर टाकलं, तरी त्यांची जोडी फुटली नाहीं अन् दिसायला तरी किती सारखे होते ते ! जणूं जुळे भाऊच ! कुठंही गेलों तरी जोडीनेंच राहायचं असं त्यांनीं ठरविलं.

त्यांना न्यायला गाडी आली. दोघेही तींत बसले. देवळाच्या बांधकामा-पाशीं ते आले. एकाची पायाच्या कामाला योजना होऊन लोक त्याला उचलूं लागले; तेव्हां दुसरा कळवळला अन् दाटक्या घशानं बोलला, ' भाऊ , मला विसरूं नकोस ! '

पहिला पायाच्या कामांत बसला. दुसरा देवळाच्या शिखरावर विराज-मान झाला. आपला भाऊ शिखरावर बसला म्हणून पहिल्याला अभिमान नी कौतुक वाटलं. एके दिवशीं त्यानं प्रेमानं हांक मारली, ' भाऊ ! '

सूर्याच्या सोनेरी किरणांत चमकणाऱ्या अन् दिमाखानं नटलेल्या त्या शिखराच्या दगडाला ती हाक ऐकूंच गेली नाहीं. पहिल्यानें पुन्हा हाक मारली, ' भाऊ, ए भाऊ, इकडं बघ. इथं आहें मी ! '

वरच्या दगडानें तिरस्कारानें त्याच्याकडे पाहिलं अन् रागानं म्हटलं, ' अरे मूर्खा, कोण कुणाचा भाऊ ? तुझं स्थान कुठं आणि माझं कुठं ? खुळ्यासारखं कांहीं तरी बडबडूं नकोस पुन्हा ! '

आपल्या सख्ख्या भावाचे ते शब्द ! पायाच्या दगडाच्या हृदयाला चरका बसला. तो संतापानं बेभान झाला. त्याचं शरीर गदगदां हालूं लागलं. क्षणांत पाया उखडला. देऊळ जमीनदोस्त झालं. शिखराचा दगड कुठल्या मातीच्या ढिगारांत गाडला गेला तें समजलं नाहीं !

**अभ्यास**–मराठींत पुष्कळ लेखकांनीं अशा कथा लिहिल्या आहेत. प्रभाकर माचवे यांची ' वाळवीची गोष्ट ' व खांडेकरांच्या ' दोन मेघ ' नी ' घरटें व धरणीकंप ' या उत्कृष्ट कथा मिळवून वाचा. तसेंच खांडे-करांचें ' सुवर्णकण ' हें निवळ रूपककथांचेंच पुस्तक मिळवून पाहा. त्यांत प्रत्येक कथेखालीं त्यांनीं रूपकाचा खुलासा केला आहे.

**प्रश्न**—(१) इसापनीति व हितोपदेश यांतलि कथांना रूपककथा म्हणतां येईल का ? (२) रूपककथेचें लक्षण कोणतें ? (३) उंदीरसिंहाच्या गोष्टी-वरची रूपककथा सांगा.

## ८ शब्दचित्र

हा एक नवीनच लेखनप्रकार रूढ झालेला आहे. लघुकथेचा हा निराळ्या धर्तीचा प्रकार म्हटल्यास चालेल. चित्राची कल्पना तुम्हांला आहेच. चित्रकार निरनिराळ्या रंगांच्या साह्यानें एखाद्या प्रसंगाचें किंवा व्यक्तीचें मोहक चित्र काढतो व तें चित्र आपण प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहूं शकतों. शब्दचित्र हें प्रत्यक्ष डोळ्यांना दिसणार नाहीं; पण त्यांतलें वर्णन अशा सूचक शब्दांनीं केलेलें असेल कीं, त्यांतली व्यक्ति अगर प्रसंग आपल्या डोळ्यापुढें स्पष्ट उभा राहील आणि असें झालें तरच तें चांगलें शब्दचित्र होय. शब्दचित्रांत हुबेहुब वर्णनाला अन् सूचक शब्दांच्या मांडणीला जास्त महत्त्व आहे. खालील शब्दचित्र पाहा. त्यांतला प्रसंग भडक रंगाच्या चित्रासारखा उठून दिसेल.

### सत्तेवर मात

तिसऱ्या प्रहरचा सुमार असेल. बापूराव मांडवाकडे आले आणि दहा रुपयांची नोट सखारामाच्या हातांत देऊन म्हणाले, ‘ आतां तासगांवाला जा, अन् दारूच्या दोन बाटल्या आण. ’

दिवसभर जें गदमदत होतं, अन् आकाशांत ढगांची जी गर्दी झाली होती, त्यावरून आतां पाऊस येणार किंवा जोराचं वादळ तरी होणार, असं स्पष्ट दिसत होतं. म्हणून सखाराम म्हणाला, ‘ आतां नाहीं. उद्यां सकाळीं जाईन. ’

त्या ‘ नाहीं ’ म्हणण्यांत बापूरावांचा संताप झाला. ते बोलले, ‘आतांच गेलं पाहिजे. आज माझे मित्र येणार आहेत. ’

‘ हा वारा सुटाय लागला, पाहिला का ? कसा जाणार मी ? ’

‘ तें मला माहीत नाहीं. तू गेलं पाहिजेस एवढंच मला कळतं ! ’

‘ असं काय ? मग तसंच मलाही कांहीं कांहीं समजतं ! ’

एकदम जोराचा वारा सुरू झाला. आकाशांत धुळीचे लोट उसळूं लागले. पालापाचोळा अन्तराळांत भिंगरीसारखा फिरूं लागला. झाडा-झुडपांच्या फांद्या करकर आवाज करीत हेलकावे खाऊं लागल्या. गंजी-

वरच्या मोकळ्या पेंढ्या पांखरागत उडून खालीं आल्या. तो गुरांचा मांडव तर इतके हेलकावे घेऊं लागला कीं, त्यानं आंतील सगळीं गुरं भयभीत झालीं. थोड्याच वेळांत पावसाचे टपोरे थेंब पडूं लागले. त्यांच्याबरोबर लिंबाएवढ्या पांढऱ्या सफेत गारा मांडवावर, घराच्या छपरावर टपटप आवाज करूं लागल्या. हें सगळें बघून तरी आतां बापूराव जायचा आग्रह धरणार नाहींत, असं सखारामाला वाटलं. पण सत्ता चालविण्याची हांव भयंकर दांडगी असते. नमणारापुढं ती कमजोर होते, पण ताठ राहाणारावर मात्र ती तुटून पडते. घरांत गेल्याबरोबर बापूरावांनीं त्याला विचारलं, ' काय समजतं तुला ? '

' आतां जाऊं नये हें ! ' शांतपणें सखाराम बोलला.

' म्हणजे तुझंच खरं म्हणायचं ! '

' नाहीं तर काय, तुमचं ऐकून मरूं ? '

' मेहेरबानी करीत नाहींस माझ्यावर ! '

' ती कुठली ? पगारच मोजतां कीं नाहीं तुम्ही ? '

बोलतां बोलतां दोघांचं इतकं वाढलं कीं, जगूं काय बाहेरच्या वादळाशीं त्यांचा सामनाच सुरूं झाला. कांहीं भाडभीड न ठेवतां सखाराम वाटेल तें बोलला. त्यामुळें बापूराव संतापले. हातांतली छडी उगारून सत्तेच्या उन्मादात ते त्याच्या अंगावर धावले. मग सखारामाला भान राहिलं नाहीं. त्यानं सरळ त्यांची मोटकुळी करून त्यांना उचललं अन् तिथल्या कठीण जमिनीवर आपटलं. त्याबरोबर बापूरावांनीं मोठ्यानं × ×.

त्याच वेळीं बाहेर कानठळ्या बसणारा आवाज होऊन वीज कुठं तरी पडली आणि वाऱ्याच्या जोरानं घराशेजारच्या एका झाडाची मोठी फांदी मोडली व तिचा ' कडकड ' आवाज झाला.

बापूरावांची × × कुणालाच ऐकूं गेली नाहीं.

**अभ्यास**—वरील शब्दचित्रांत वादळाचा नि भांडणाचा प्रसंग सगतीनें डोळ्यापुढें उभा केलेला आहे. अशाच तऱ्हेनें एखाद्या व्यक्तीच्या स्वभावाचें, खोडीचें, पोषाखाचें वगैरे वर्णन करून व्यक्तीचें चित्र रंग-

वितात. शब्दचित्राचे दोन प्रकार पडतात. ( १ ) प्रासंगिक शब्दचित्र ( २ ) व्यक्तिगत शब्दचित्र. र. ज. सामंत यांचें " हृदय " हें पुस्तक पाहा. त्यांत अशा शब्दचित्रांचाच संग्रह केला आहे.

प्रश्न—(१) चांगलें शब्दचित्र कोणतें ? (२) शब्दचित्रांत कोणत्या गोष्टीला जास्त महत्त्व आहे ? (३) शब्दचित्रांचे प्रकार कोणते ?

---

## ९ विनोदी वाङ्मय

माणसाच्या जीवनांत विनोदाला मोठें महत्त्व आहे. सामान्य माणसेंही नेहमीच्या बोलण्यांत अगर वागण्यांत विनोद उत्पन्न करतात. विनोदानें स्वतःची तर करमणूक होतेच, पण इतरांचीहि होते आणि त्याबरोबर सर्वांनाच क्षणभर हंसायला मिळतें. कष्टांनीं आणि दुःखांनीं भरलेल्या माणसाच्या जीवनांत जर त्याला घडीभर हंसायला मिळालें तर तितकेंच तें सुखद होतें. दुःखी माणसाला तर हसवावेंच, पण सुखी माणसालाही हसवून एकंदर जीवन गमतीचें करावें, यासाठींच विनोदी वाङ्मयाचा जन्म झालेला आहे आणि असें वाङ्मय सध्यां पुष्कळच निर्माण झालेलें आहे.

समाजांत भिन्न भिन्न स्वभावगुणांचीं माणसें कितीतरी आढळतात आणि त्यांच्या वागण्यानें विनोद उत्पन्न होतो. तसेंच अनेक गमतीचे प्रसंग निर्माण होतात अन् त्यामुळेंहि विनोदाची उत्पत्ति होते. व्यक्तीमुळें विनोद निर्माण झाल्यास त्याला 'व्यक्तिनिष्ठ विनोद' म्हणतात व प्रसंगावरून निर्माण झाल्यास त्याला 'प्रसंगनिष्ठ विनोद' म्हणतात. तिसरा एक शाब्दिक विनोद किंवा कोट्या या नांवाचा प्रकार रूढ आहे. त्यांत बहुतेक लहान चुटक्यांचा समावेश होतो.

एकादी विसराळू स्वभावाची व्यक्ति असावी, तिला तिच्या मित्रानें लग्नाचें आमंत्रण द्यावें, पण कशाचें आमंत्रण आहे याचें त्या व्यक्तीला विस्मरण पडावें आणि शेवटीं तें बारशाचें असावें असें आठवतां तिनें अंगडें टोपडें घेऊन त्या लग्नसमारंभांत हजर व्हावें ! अगर एकाद्या व्यक्तीनें नाटक पहाण्यासाठीं थिएटरवर जावें अन् तिकीट मात्र घरीं विसरलेलें असावें

किंवा स्त्रियांशीं कधींहि न बोललेल्या एकाद्या माणसावर तो स्वतःची छत्री उघडून पावसांतून चालला असतांना एकाद्या तरुण स्त्रीला त्या छत्रींत घेण्याचा प्रसंग यावा, तसेंच एकाद्याला डोळे मिचकावण्याची संवय असावी अन् त्यामुळें एकाद्या स्त्रीचा विनयभंग होऊन तिनें त्याच्यावर विनयभंगाची फिर्याद करावी; अशीं कितीतरी व्यक्तिनिष्ठ विनोदाचीं उदाहरणें सांगतां येतील.

तसेंच कुठल्या तरी यात्रेला जाण्यासाठीं आपण गाडी जुंपून काळोख्या रात्रीचें निघावें, मध्यंतरीं गाडीवान पेंगावयास लागावा, कुठल्या तरी वळणावर बैलांनीं परत फिरविलेलीं तोंडें कुणाच्याच ध्यानांत येऊं नयेत ! आणि उजाडतांच आपण यात्रेच्या ठिकाणीं पोंचण्याऐवजीं आपल्याच घराच्या आंगणांत यावें अथवा एकाद्यानें जिवाला वैतागून नदींत उडी टाकावी, तो कोळ्याच्या जाळ्यांत अडकावा अन् मोठा मासाच लागला असेल या आशेनें कोळ्यांनीं जाळें भरभर ओढून त्याला बाहेर काढावें, किंवा एकाद्या पोरानें आपटबार उडवावा, त्याचा आवाज ऐकून कुणीतरी गोळीबाराची अफवा उठवावी आणि सगळ्या लोकाना पळतां भुई थोडी व्हावी, अशीं प्रसंगनिष्ठ विनोदाचीं उदाहरणेंही कांहीं थोडीं नाहींत. अशा व्यक्ति आणि असे प्रसंग निवडूनच लेखक विनोदी वाङ्मय तयार करीत असतो. हें वाङ्मय नाटकें, गोष्टी, लेख, चुटके इत्यादि स्वरूपांत आढळून येतें.

### अभ्यास

**नाटकें**–( १ ) आचार्य अत्रे यांचीं साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा, पराचा कावळा. ( २ ) ना. धों. ताम्हनकरांचें उसना नवरा, ( ३ ) कै. गडकरी यांचें वेड्यांचा बाजार. ( ४ ) शं. गो. साठे यांचें छापील संसार. ( ५ ) प्रो. फडके यांचें तोतया नाटककार.

**लेख**–सुदाम्याचे पोहे, ( कोल्हटकर ), संपूर्ण बालकराम ( गडकरी ), विनोदी लेखसंग्रह (कॅ. लिमये), साहित्य सुदाम ( चि. मा. दी. पटवर्धन ), थालीपीठ ( ग. स. मराठे ).

**गोष्टी**–( १ ) चिं. वि. जोशी—एरंडाचें गुऱ्हाळ, वायफळाचा मळा.

( २ ) शामराव ओक—मालगाडी, कोपरखळ्या. ( ३ ) अत्रे—ब्रँडीची बाटली व इतर गोष्टी. ( ४ ) ताम्हनकर—चकमकी.

**चुटके**—यासंबंधींचीं स्वतंत्र पुस्तकें क्वचित् आहेत. पण मनोहर, ध्रुव, सह्याद्रि इत्यादि मासिकांतून आणि रविवार-सकाळसारख्या वर्तमानपत्रांतून असे चुटके नेहमीं येत असतात. चुटक्यांतून विनोद कसा निर्माण होतो, तें पुढील नमुन्यांवरून ध्यानांत येईल.

**शिक्षक**—प्रत्येक पौर्णिमेला समुद्राच्या पाण्याला भरती येते.

**विद्यार्थी**—गुरुजी, उगीच कांहीं तरीच सांगतां झालं. मी समुद्राचं पाणी एका बाटलींत भरून ठेवलंय नी दोन पौर्णिमा झाल्या तरी तें न वाढतां कमी कमीच व्हायला लागलंय !

* * *

**गिऱ्हाईक**—आतां मी हें तुमच्याकडून पैशाचें तेल नेलें. यांत सगळ्या मुंग्याच आहेत.

**दुकानदार**—मग पैशाच्या तेलांत मुंग्या नाहींतर काय हत्ती—घोडे येतील !

* * *

**प्रश्न**—( १ ) चुटक्यांतून विनोद कसा निर्माण होतो ? तुम्ही दोन चुटके बनवून पाहा. ( २ ) विनोदाचे प्रकार कोणते ? ( ३ ) प्रसंगानिष्ठ विनोदाचें एक उदाहरण सांगा. ( ४ ) विनोद-वाङ्मयाची जरूरी काय ?

---

## १० नाटक व नाटिका

( १ ) **नाटक**—नाटक, हें संसाराचें चित्र समजतात. संसारांत जसें घडतें किंवा घडावें अशी अपेक्षा असते, तें अनेक व्यक्तींच्या अथवा प्रसंगांच्या साह्यानें प्रत्यक्ष रंगभूमीवर करून दाखविलें जातें. म्हणजे त्या व्यक्ति रंगभूमीवर कसें बोलतील किंवा वागतील यांचें जें संवादरूपानें लेखन केलेलें असतें, त्यालाच नाटक असें म्हणतात. अशा तऱ्हेचीं नाटकें लिहून तीं लोकांपुढें करून दाखविण्याची प्रथा फार जूनी आहे. भवभुति-

कालिदासापासूनची ही परंपरा आहे. सामान्य लोकांना या नाटकांचा परिचय नव्हता, तरी तीं माणसेंही ललित, सोंगें वगैरे रूपानें पुराणें व इतिहास यांतील प्रसंग करून दाखवीत होतीं.

नाटकानें एकाच वेळीं शेंकडों नव्हे हजारों लोकांची करमणूक होते व त्यामुळें यांत संवादांना व त्यापेक्षांही पद्यांना फार महत्त्व होतें. पूर्वीच्या एकेका नाटकांत ५०।६० पदें असत. हीं सर्व पदें व संवाद व्हायचे म्हणजे रात्रीं नऊ दहाला सुरू झालेलें नाटक सकाळीं दिवस उगवतांना संपायचें! नाटक बघायला जायचें म्हणजे गायन ऐकायलाच जायचें अशीच सर्व लोकांची कल्पना होती.

पण हल्लींच्या नाटकांचा विस्तार फार तर ३।४ तासांचा असतो व पदेंही अगदीं मोजकींच म्हणजे सुमारें १०।१२ असतात. या पद्धतीनें नाटकें लिहून तीं लोकप्रिय करणारे आजचे पहिले नाटककार म्हणजे आचार्य प्रल्हाद केशव अत्रे हे होत. याशिवाय नाटकांचे विषय आणि पद्धति यांतही पुष्कळच बदल झालेला आहे, तो निराळाच.

पूर्वींच्या नाटकांतला विषय म्हणजे वाचकांना परिचित असलेले पुराणें व इतिहास यांतील प्रसंग हे होत. पण हल्लींचीं नाटकें बहुधा सामाजिक विषयावरच निर्माण होत आहेत. कादंबऱ्या ज्याप्रमाणें देवादिकांच्या नी राजेरजवाड्यांच्या विषयांवरून सामाजिक विषयावर आल्या, त्याचप्रमाणें नाटकांतही हा बदल कालमानानें झाला. कादंबरीप्रमाणेंच व्यक्ति, प्रसंग व त्यांच्या साह्यानें घडणारें कथानक नाटकात सांगितलेलें असतें. त्या कथानकांत लेखक आपल्या आवडीप्रमाणें कुठलाही विषय रंगवूं शकतो. उदा० स्त्रियांचीं व गरिबांचीं दुःखें, हुंड्याची अनिष्ट चाल, दारूबंदी, विवाहाच्या पद्धति, स्थानिक स्वराज्याचा कारभार, प्रेम, देशसेवा वगैरे.

कोणाताही विषय असो, तो कादंबरी, लघुकथेप्रमाणेंच वाचकांची आतुरता वाढेल अशा पद्धतीनें नाटकांतही सांगितला जातो. म्हणून त्या दृष्टीनें नाटकरचनेचेही तीन टप्पे पडतात. ते असेः—(१) गुंतागुंत, (२) त्या गुंतागुंतीचा कळस व (३) गुंतागुंतीचा उलगडा. नाटकाचे अंक

बहुधा या टप्प्यांना धरूनच असतात व त्या अंकांची संख्याही सामान्यतः तीनच असते. कथानकाचे तीनही टप्पे बरोबर या तीन अंकांत बसविलेले असतात.

पहिल्या अंकांत पात्रांचा परिचय होऊन असा एकादा पेचप्रसंग त्या अंकाच्या शेवटीं आला पाहिजे कीं, दुसऱ्या अंकासाठीं प्रेक्षक-वाचकांची आतुरता वाढावी. दुसऱ्या अंकांत त्या प्रसंगाचें अधिक विवेचन येऊन शेवटीं जास्तच गुंतागुंत किंवा महत्त्वाचा पेचप्रसंग आला पाहिजे कीं, त्यामुळें वाचकांची आतुरता अधिकच वाढावी. शेवटच्या तिसऱ्या अंकांत त्याचा उलगडा किंवा पात्रांचें काय झालें त्याचें दिग्दर्शन झालें कीं संपलें.

वरीलप्रमाणें नाटकांची तंत्रशुद्ध रचना समजण्याकरितां प्रो. फडके यांचें 'संजीवन' नाटक वाचून पहा. त्यांत प्रेमाची थोरवी पटविलेली आहे.

नाटकांची रचना करतांना त्यांतील संवादाकडे अधिक लक्ष दिलें जातें. तसेंच ते संवाद चटकदार नि सुटसुटीत असावे लागतात आणि त्यांमधूनच सर्व घटना व पात्रांचे स्वभावगुण दिसतील अशी त्यांची योजना केलेली असते. अत्रेकृत ' वंदे भारतम् ' मधील नाट्यसंवादाचा पुढें दिलेला छोटासा नमुना पहा.

( २ ) **नाटिका**—नाटिकेची रचना सर्व बाबतींत नाटकाप्रमाणेंच असते. फरक इतकाच कीं, हिचें कथानक आणि त्याचा विस्तार हीं एक अंक किंवा क्वचित् दोन अंक एवढाच असतो, त्या दृष्टीनें नाटिकेला नाटकाची लहान बहीण म्हटल्यास शोभेल.

* * * *

## नाट्यसंवादाचा नमुना

**' वंदे भारतम्—'** ( अत्रे ) पृ. ४५ ते ४७

**दिलीप**—हें पहा कल्याण, तुमच्यासारख्या उत्साही तरुणांनीं अशा तऱ्हेनें आपल्या सामर्थ्याचा इतक्या लौकर व्यय करावा हें कांहीं ठीक नाहीं. तुम्हांला खरोखरच कांहीं कार्य करावयाची इच्छा असेल तर मी तुम्हांला देतों एक कामगिरी. तुम्ही आमच्या हिंदुसंघटनाच्या चळवळींत

सामील व्हा.

**कल्याण**—मी, आणि हिंदुसंघटनाच्या चळवळींत येऊं म्हणतां ! काय, थट्टा करतां काय माझी ! अहो, मी ब्राह्मण तर नाहींच नाहीं, पण हिंदु तरी आहे काय याची मला शंका आहे. मी नरकांत जाणार म्हणून आमचे वडील तर रोज छातीवर हात मारून सांगत असतात !

**दिलीप**—तें कां ?

**कल्याण**—हें पाहा, मी जन्मानें ब्राह्मण आहें. पण कित्येक वर्षे संध्या केल्याचं मला आठवत नाहीं. गळ्यांत जानव्याचा दोराही नाहीं, कीं डोक्याला शेंडीचा एक केस नाहीं. वडील जिवंत असतांना मी मिशा साफ खतम करतों. अर्थात् याचा वाडिलांच्या प्रकृतीवर काहीं परिणाम होत नाहीं, ही गोष्ट निराळी. कोठल्याही देवळांत मी कधीं जात नाहीं, कीं कोणत्याही देवापुढें मी टाळकं कधीं वांकवीत नाहीं. कोणताही धर्म-ग्रंथ मी कधीं वाचला नाहीं. गीता नांवाची एक मुलगी मला माहीत आहे; पण गीता नावाचा ग्रंथ मी पाहिलासुद्धां नाहीं. इराण्याच्या दुकानांत जाऊन मी चहा पितों; काय वाटेल तें खातों,–आणखीहि अनेक भानगडी करतों. मग आतां तुम्हीच सांगा कीं, औषधापुरतं तरी माझ्यांत हिंदुत्व आहे का ?

**दिलीप**—अगदींच मूर्ख आहेस. तूं काय वाटेल तें केलंस म्हणून तुझं हिंदुत्व कसं नाहींसं होईल ! तुझ्यासारखे शेंकडों हिंदु तरुण आहेत आपल्या समाजांत ! त्यांनाही असच वाटतं ! मी सांगतों तुला, तूं नुसता हिंदु नाहींस तर पक्का हिन्दु आहेस–

**कल्याण**—म्हणजे ! मी संध्या करीत नाहीं तरी हिंदू ?

**दिलीप**—होय, तरी हिन्दु !

**कल्याण**—देवळांत जात नाहीं तरी मी हिन्दु ?

**दिलीप**—होय, तरी हिन्दु !

**कल्याण**—महाराबरोबर जेवलों तरी हिन्दु !

**दिलीप**—महारणीबरोबर लग्न केलंस तरी तूं हिन्दु !

**कल्याण**-–इराण्याच्या दुकानांत जाऊन काय वाटेल तें खातों तरी मी हिन्दु !

**दिलीप**--होय,–होय,–होय, तरी तूं हिन्दूच ! इराण्याच्या दुकानांतलि जिनसाच काय पण सबंधच्या सबंध इराणी जरी तूं घशांत घातलास तरी तूं हिन्दुच ! तुझ्या पोटांत काय जातं यावर धर्म अवलंबून नसून तुझ्या हृदयांत काय आहे यावर धर्म अवलंबून आहे.

**कल्याण**––काय म्हणतां ! अजब शोध लावलांत तुम्हीं आज ! जीते रहा मेरा हिंदुधर्म ! मला वाटत होतं कीं, माझ्या धर्माचा कधींच निकाल लागला.

**दिलीप**––छट् ! धर्म कधीं बाटत नाहीं, कीं बुडत नाहीं. धर्म हा चिरंतन आणि अमर आहे. तुझ्या वडिलांपेक्षां तूं शतपटीनें शुद्ध हिन्दु आहेस !

हा आर्य धर्म माझा !
अमर जगीं पसरितो तेजा !
मलिन जरी भासला चन्द्रमा !
दिपवी जगास मार्तंड हा !
बुडवि नभीं तारकापुंजा !

**कल्याण**––म्हणजे काय म्हणतां काय ?

**दिलीप**––तुझ्या वडिलांचं धर्मप्रेम ब्राह्मण्याच्या आकुंचित अभिमानानें पांगळं झालं आहे, तर जातिबंधनें तोडण्याच्या तुझ्या नैसर्गिक वृत्तीमुळें समानतेच्या व स्वातंत्र्याच्या पायावर उभारलेल्या खऱ्या व्यापक धर्माचा तूं आजपर्यंत पुरस्कार करीत आला आहेस.

**कल्याण**––आज तुम्हीं नवीन प्रकाश मला दाखवलात ! यापुढें तुम्हींच माझे गुरु आणि तुम्हींच माझे शंकराचार्य ! असा हिंदुधर्माचा अभिमान संचारला आहे म्हणतां माझे आंगांत या वेळीं ! आमचे वडील भेटायला पाहिजेत या वेळीं. खुर्दाच करून टाकतों त्यांचा ! सांगा काय करूं तें !

दिलीप—चल माझ्याबरोबर, म्हणजे सांगतों ! [ जातात. ]

*　*　*　*

**अभ्यास**—नाटकाचे ३ प्रकार पडतात. ( १ ) पौराणिक–कीचकवध स्वयंवर, द्रौपदी. ( २ ) ऐतिहासिक–भाऊबंदकी, आग्र्याहून सुटका, ( ३ ) सामाजिक–एकच प्याला, मानापमान, सोन्याचा कळस.

**कलापूर्ण नाटकें**—( १ ) अत्रेकृत–घराबाहेर, उद्यांचा संसार. (२) वरेरकरकृत–कोरडी करामत, पतित पावन (३) रांगणेकरकृत–कन्यादान, नंदनवन. ( ४ ) खाडिलकरकृत–कीचकवध, सवाई माधवरावांचा मृत्यु. ( ५ ) फडकेकृत–संजीवन, (६) गडकरीकृत–एकच प्याला, पुण्यप्रभाव.

**नाटिका**—(१) फडके–आगलावी, जडावाची देवी. (२) वरेरकर–तुरुंगाच्या दारांत, सदा बंदीवान. (३) ताम्हनकर–नवऱ्याला वेसण, (४) मा. कृ. शिंदे–गुंतागुंत. ( ५ ) गद्रे–कॉलेजकुमारी, पुणेरी जोडा. ( ६ ) वर्तक–बेबी.

**प्रश्न**—( १ ) जुन्या व नव्या नाटकांत काय फरक आहे ? ( २ ) नाटकाच्या रचनेचे टप्पे कोणते ? ( ३ ) पहिल्या अंकाची रचना कशी असावी ? ( ४ ) संवादाची योजना कशी करावी लागते ? ( ५ ) नाटकांचे प्रकार किती पडतात ? कोणत्या दृष्टीनें ?

---

## ११ नाट्यछटा

हा प्रकार मराठी भाषेंत अलीकडेच रूढ झालेला असून तो लघुतम कथे-सारखा त्रोटक असतो. एकच प्रमुख पात्र एकाद्या विषयावर किंवा उत्कट प्रसंगावर दुसऱ्या कोणाशीं तरी बोलत आहे, अशा कल्पनेनें हा प्रकार लिहितात. यांत सुरवातीपासून अखेरपर्यंत एकाच पात्राचें बोलणें दिलेलें असतें. ऐकणारें पात्र मध्यें कांहीं बोललें असलें तरी त्यांचें तें बोलणें या लेखनांत येत नाहीं. पण प्रमुख पात्र आपल्या बोलण्यांत त्या प्रश्नांना जीं उत्तरें देतें, त्यांवरून तीं इतर पात्रें काय बोललीं असतील तें वाचकाला समजतें.

नाट्यछटा हें एकाद्या व्यक्तीचें स्वगत म्हणजे स्वतःशीं केलेलें भाषण नाहीं. तें नाटकाप्रमाणें दुसऱ्या व्यक्तीशींच केलेलें भाषण असतें. पण नाटकाप्रमाणें त्या दुसऱ्या व्यक्तीचें भाषण मात्र या लेखनांत अजीबात येत नाहीं. हें याचें एक वैशिष्ट्य आहे.

नाट्यछटेची भाषा अगदीं नेहमींच्या बोलण्याप्रमाणेंच पण आकर्षक नी सुटसुटीत असते. जो लहानसा विषय किंवा छोटासा प्रसंग असेल, तो वाचकांना चटकदार वाटेल अशी त्याची सुरवात करतात. आणि शेवट लघुतम कथेसारखा कलाटणीनें करतात. त्यामुळें ही छटा अधिक प्रभावी ठरते. उदा० 'स्वतंत्र धंदा' या विषयावर एकादी व्यक्ति बोलत आहे. ही व्यक्ति बाहेरच्या एकाद्या तरुणाला "नोकरी फार वाईट, धंदा फार चांगला, कोणताही धंदा तरुणांनीं करावा" असें सुरवातीला बोलेल, तो तरुण गेल्यावर त्या बोलणाऱ्या व्यक्तीचा जर मुलगाच आला तर एकदम कलाटणी घेऊन तीच व्यक्ति 'धंदा फार वाईट, नोकरीच चागली' असें बोलेल! अशा या कलाटणीयुक्त लेखनानें नाट्यछटा फार परिणामकारक होते. नाट्यछटेचा खालील नमुना पहा.

## श्रेष्ठ आहार! (म. भा. भोसले)

मग, सांगतों काय तर! भगवान बुद्धापासून महात्मा गांधीपर्यंत कोणाचेंही मत विचारा, शाकाहार हाच श्रेष्ठ आहार ठरेल. शाकाहारानं आरोग्य आणि मनाचा सात्विकपणा वाढतो! इतकंच नव्हे तर निव्वळ शाकाहार करून शंभर वर्षे जगल्याचीं उदाहरणं मी तुम्हांला दाखवूं शकेन. म्हणून शाकाहार हाच श्रेष्ठ आहार आहे! काय म्हणतां? मांसाहाराची प्रथा वाढत आहे? अहो, वाढत असली तर तिला तुमच्यासारख्या तरुणांनीं आळा घातला पाहिजे! अन् शाकाहाराचं महत्व लोकांना पटविलं पाहिजे. खरं कीं नाहीं? कोण पांडू? काय रे? जेवण तयार आहे म्हणतोस? आलोंच मी! बघितलंत, घड्याळांत दहाचे ठोके पडले. या ठराविक वेळेला जेवायचं हा माझा नेम आहे! बराय मंडळी! आम्ही ना? अं, शाकाहारच घेतों आपण! अच्छा, नमस्ते! ताट वाढलंस ना पांडू? हा मी

आलोंच बघ. पण काय रे, काय केलंय हें आज ! सगळे शाकाहाराचे पदार्थ ! गाढवा, असलं जेवण मला चालत नाहीं, हें माहीत नाहीं तुला ? काय म्हणतोस ? आज एकादशी ? मग असेल ! आमच्या खाण्याशीं तिचा काय संबंध ? चल, धांव आतांच्या आतां, एकादा मासा निदान ...जेवणाला तासभर उशीर झाला तरी हरकत नाहीं ! पण कबाब किंवा पुलावाशिवाय मला जेवणच जाणार नाहीं ! जा लवकर ! !

**अभ्यास**—कै. दिवाकर यांचें निव्वळ नाट्यछटांचाच संग्रह असलेलें ' नाट्यछटा ' हें पुस्तक वाचा. शिवाय मासिकांतून नी साप्ताहिकांतून कांहीं नाट्यछटा नेहमीं प्रसिद्ध होत असतात. त्याही पाहा.

**प्रश्न**—( १ ) नाट्यछटेला स्वगत भाषण म्हणतां येईल का ? ( २ ) नाट्यछटेंतील इतर व्यक्तींचें भाषण आपणांला कसें समजतें ? ( ३ ) ' श्रेष्ठ आहार ' या वरील नाट्यछटेंत कलाटणी कशी दिलेली आहे ?

---

## १२ चरित्र

आपल्या महान कार्यानें ज्या व्यक्ति मोठेपणाला चढतात, त्यांच्या जीवनाबद्दल सामान्य लोकांना साहजिकच जिज्ञासा उत्पन्न होते. ही जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं आणि उदाहरणानें त्यांना कार्यप्रवृत्त करण्याला हुरूप व स्फूर्ति मिळण्यासाठीं चरित्रें लिहिलीं जातात. अर्थातच ज्याचें चरित्र लिहावयाचें तो माणूस असामान्य असला पाहिजे. इतरांना सांगण्यासारखें, ऐकण्यासारखें किंवा उत्साह व स्फूर्ति देण्यासारखें त्याच्या जीवनांत काहींतरी घडलेलें किंवा त्यानें करून दाखविलेलें असलें पाहिजे. तरच तें चरित्र लोक वाचतील ! उदा०—एकादा राजाचे पोटीं जन्मला, त्यानें आणखी राज्य मिळविलें, पराक्रम गाजविला आणि सुखानें राज्य केलें; तरी अशांच्या चरित्रापेक्षां जो सामान्य माणसाच्या पोटीं जन्मला, त्यानें विद्वत्ता संपादन केली, राज्य मिळविलें किंवा लोकोत्तर पुढारी झाला; अशांचें चरित्र लोकांना अधिक आकर्षक नि स्फूर्तिदायक वाटेल ! यावरून कोणत्या व्यक्तींचें चरित्र लिहितात याची कल्पना येईल.

जिचें चरित्र लिहावयाचें ती व्यक्ति हयात असेल तर तिच्या जन्मापासून हयातीपर्यंत आणि हयात नसेल तर मृत्यूपर्यंत तिच्या जीवनाची सगळी खरी माहिती मिळवून ती जन्म, बालपण, शिक्षण या कालानुक्रमानें लिहिणें म्हणजेच तिचें चरित्र लिहिणें होय. कादंबरीप्रमाणें चरित्रांत कल्पनेला अजिबात वाव नाहीं, त्यांतल्या सगळ्या घटना नि प्रसंग खरेच असतात. चांगली भाषा आणि वर्णनशैली यायोगें एकेक चरित्र कादंबरीपेक्षांही चटकदार होतें. नमुन्याकरितां श्री. अमरेंद्र यांनीं लिहिलेल्या ' सुभाषचंद्र ' चरित्रांतील खालील परिच्छेद वाचून पाहा,

" १९३४ डिसेंबरच्या प्रारंभाला एक दुर्दैवी घटना घडली. सुभाषबाबूंचे वडील जानकीनाथ हे अत्यवस्थ असल्याची वार्ता सुभाषबाबूंना कळल्यामुळें ते मोठ्या प्रयासानें सरकारी संमति मिळवून स्वदेशीं आले, परंतु दुर्दैवानें ते कराचीला येऊन पोहोंचेपर्यंत इकडे त्यांच्या पित्याचें निधन झालें होतें. ते आपल्या आवडत्या कलकत्त्याला अगदीं विमानगतीनें गेले. तरी पितृभेटीचें समाधान काहीं त्यांना मिळूं शकलें नाहीं. सरकारी भुंगा मागें होताच. विमानतळावरून थेट घरींच जाण्याची आज्ञा सरकारनें त्यांच्यावर जशी लादली, तसाच दुसरा एक कठोर निर्बंध त्यांच्यावर त्यानें घातला कीं, सात दिवसांच्या आंत मायभूमींतून त्यांनीं पुन्हां परदेशीं निघून गेलें पाहिजे. अखेर घरच्याघरींच स्थानबद्ध केलेल्या या चंडोलाला वडिलांच्या श्राद्धापर्यंत घरीं राहाण्याची सवलत सरकारनें मोठ्या उदारपणें दिली ! "

**अभ्यासः**—( १ ) महात्मा गांधी जीवनचरित्र ( शिखरे ). ( २ ) सावरकरचरित्र ( करंदीकर ), ( ३ ) रॉय चरित्र ( भाई बेके ), ( ४ ) वामन मल्हार जोशी–चरित्र ( पटवर्धन ), ( ५ ) आगरकरांची ओळख ( पु. पां. गोखले ), ( ६ ) जोसेफ मॅझिनी ( सावरकर ), ( ७ ) स्टॅलिन ( भुस्कुटे ), इ. चरित्रें वाचा.

**प्रश्नः**——१ चरित्रें कां लिहिलीं जातात ? २ कोणत्या व्यक्तीचें चरित्र लिहावें ? ३ चरित्रें चटकदार करण्याचीं साधनें कोणतीं ?

## १३ आत्मचरित्र

जेव्हां चरित्रनायक स्वतःचें चरित्र स्वतःच लिहितो, अशा वेळीं त्या चारित्राला आत्मचरित्र, आत्मवृत्त किंवा आत्मकथन म्हणतात. अशीं चरित्रें बहुतेक थोर लोकच लिहितात. मराठी भाषेंत अशीं चरित्रें बरींच आहेत. स्वतःचें चरित्र स्वतःच लिहावयाचें म्हटल्यानंतर साहजिकच स्वतःचे दोष न सांगतां गुणच तेवढे सांगण्याची वृत्ति बळावते. पण अशीं चरित्रें चांगलीं ठरत नाहींत. कुठलाही दोष न झाकतां तिऱ्हाइताच्या दृष्टीनें आपल्या जीवनाकडे बघून खऱ्या खऱ्या सगळ्या घटना आणि सगळे गुणदोष ज्यांत मोकळेपणानें सांगितले जातात, अशींच आत्मचरित्रें सरस मानलीं जातात. महात्मा गांधींनीं ' सत्याचे प्रयोग ' या नांवाचें जें आत्मचरित्र लिहिलें आहे, त्याला आत्मचरित्राचा उत्कृष्ट नमुना समजतात. कारण त्यांत महात्माजींनीं आपल्या जीवनांतल्या सगळ्या बारिकसारीक घटना आणि गुणदोष अत्यंत मोकळेपणानें सांगितलेले आहेत. नमुना म्हणून त्यांतील एक उतारा खालीं दिला आहे तो पाहा.

### ' हायस्कुलांत '

' संस्कृतानें मला भूमितीपेक्षांही अधिक त्रास दिला. भूमितीमध्यें घोकायचें कांहींच नसतें, पण संस्कृतांत पाहातों तों सर्व कांहीं घोकायचेंच. हा विषयही चौथ्या इयत्तेपासून सुरू झाला. सहाव्या इयत्तेंत मी हरलों. संस्कृत शिक्षक फार कडक होते. त्यांना विद्यार्थ्यांना खूप शिकविण्याचा लोभ असे. संस्कृतवर्ग आणि फारसीवर्ग यांमध्यें एक प्रकारची स्पर्धा असे. फारसी शिकविणारे मौलवी गरीब होते. विद्यार्थी आपसांत बोलत असत कीं, फारसी फार सोपें आहे आणि फारसी शिक्षक फार सज्जन मनुष्य आहेत. विद्यार्थी करतील तेवढ्यावर ते चालवून घेतात. मी पण सोपें आहे असें ऐकून लोभांत पडलों आणि फारसीच्या वर्गांत जाऊन बसलों. संस्कृत शिक्षकाला दुःख झालें. त्यांनीं मला बोलावलें, " तूं कोणाचा मुलगा हें तरी ध्यानीं आण. तुझ्या धर्माची भाषा तूं शिकणार नाहींस ? तुला ज्या अडचणी येतील त्या मला दाखव. माझी तर सर्व मुलांना उत्तम संस्कृत शिकविण्याची इच्छा आहे. तूं असा कंटाळून जाऊं नकोस. तूं

पुन्हा माझ्या वर्गांत येऊन बैस. '' मी शरमलों. शिक्षकाच्या प्रेमाची अवगणना माझ्यानें करवली नाहीं. आज माझा आत्मा कृष्णाशंकर मास्तरांचे उपकार मानीत आहे. कारण कीं, जितकें संस्कृत मी त्या वेळीं शिकलों, तेवढेंही जर शिकलों नसतों, तर आज संस्कृत शास्त्रामध्यें मला जी गोडी वाटते ती वाटली नसती. मला तर याचाच पश्चात्ताप होत आहे कीं, मी संस्कृत जास्त शिकलों नाहीं. कारण कीं कोणाही हिन्दु बालकानें संस्कृताचा सरस अभ्यास केल्याशिवाय राहूं नये. ''

**अभ्यास**—सत्याचे प्रयोग ( म. गांधी ), स्मृतिचित्रें ( लक्ष्मीबाई टिळक ), माझें आत्मवृत्त ( कर्वे ), आमच्या आयुष्यांतील आठवणी ( रमाबाई रानडे ), स्मरण-सांखळी ( डॉ. कमळाबाई देशपांडे ), गतगोष्टी ( न. चिं. केळकर ), माझी जन्मठेप ( सावरकर ), जवाहरलाल नेहरूंचें आत्मचरित्र, हीं पुस्तकें वाचून पाहा.

**प्रश्न**—( १ ) आत्मचरित्र म्हणजे काय ? ( २ ) कोणतें आत्मचरित्र सरस समजावें ? ( ३ ) मराठींतील चांगलीं आत्मचरित्रें कोणतीं ? ( ४ ) तुमच्या मतें आत्मचरित्र लिहिण्यास सुरवात केव्हां करावी ? कां ?

## १४ टीकावाङ्मय

प्रसिद्ध झालेल्या कुठल्याही पुस्तकावर त्यांतील गुणदोष दाखविण्यासाठीं जें लिखाण करतात, त्यास टीकालेख, परिचयलेख किंवा परीक्षण असें म्हणतात. बऱ्याच मासिकांतून व साप्ताहिकांतून अशीं परीक्षणें वरचेवर येत असतात. केव्हां केव्हां अशीं परीक्षणें एकत्र छापून त्यांचें स्वतंत्र पुस्तकच तयार केलें जातें. कोणत्याही पुस्तकावर कोणीही टीकालेख लिहूं शकतो. तथापि टीकालेख हा पुस्तकांतील प्रतिपाद्य विषयाशी जो अभ्यासू वृत्तीनें समरस झालेला असतो, त्याचेकडूनच तो उत्तम वठला जातो; आणि असे टीकालेखच वाचकांना पुस्तकाच्या अंतर्बाह्य सजावटीचे गुणदोष अचूकपणे दाखवूं शकतात. टीकालेखामुळें सामान्य वाचकांना पुस्तकांचा परिचय होऊन त्यांची निवड करण्यास सोपें जातें. थोडक्यांत असेंही म्हणतां येईल

कीं, टीकालेख हा एक पुस्तकाची सुंदर व सविस्तर जाहीरातच होय. या लिखाणांत सामान्यपणें गुण व उपयुक्तता यांचें वर्णन विशेष करून अक्षम्य असे ठळक ठळक दोष दाखविले जातात आणि शेवटीं ग्रंथलेखकांस उत्साहवर्धक अशा शब्दांत पुढील लेखनाकरितां सूचना दिल्या जातात. टीकालेखाचा नमुना म्हणून पुढें एक परिच्छेद दिला आहे तो पाहा.

**समरांगण** ( कादंबरी ) टीकाकार—बा. कृ. गलगली.

" श्री. भोसले यांनीं वर्णिलेलें समरांगण प्रासंगिक लढाईचें नाहीं, तर तें खेडेगांवात नेहमीं चालणाऱ्या विग्रहाचें आहे. एक जुन्या पिढींत वाढलेला जमीनदार बापूसाहेब व नवीन विचारसरणीनें प्रेरित होऊन शेतकरी कामकरी वर्गाच्या उन्नतीकरिता झटणारा आणि झगडणारा त्यांचा मुलगा भगवान यांच्या विरोधी भूमिकेंतून जे निरनिराळे समरप्रसंग निर्माण झाले ते लेखकानें आपल्या साध्यासुध्या भाषेंत रंगविले आहेत वडिलांच्या इच्छेविरुद्ध मुलगा मुंबईच्या संपाचा पुढारी होतो. पुढें नदीला पूर येऊन गरीब शेतकऱ्यांचीं घरें वाहून जातात तेव्हा निराश्रितांना भगवान आपला जुना वाडा रहायला देतो, पण बापूसाहेब त्या लोकांना हाकलून देतात. तेव्हां गरीब लोक संतापानें जाळपोळ करतात ! शेतकऱ्यांना अन्न मिळत नाहीं, तेव्हां ते बापूसाहेबांच्या दारासमोर सत्याग्रह करतात आणि तोहीं भगवानच्या नेतृत्वाखालींच ! धान्याचें पेव उकरून आपल्या पोटाचा प्रश्न सोडविण्याचाही उपक्रम गांजलेले शेतकरी करतातच या 'लढाऊ' प्रसगांत बापूसाहेब स्वस्थ बसणें अर्थातच शक्य नाहीं. पण प्रत्यक्ष मारामारींत त्यांच्यावर प्राणत्यागाची पाळी येते. कादंबरींतील या मुख्य प्रसंगावरून भडक प्रसंगाचें चित्रण कसें योग्य रीतीनें करण्यांत आलें आहे याची कल्पना येईल. "

**अभ्यास**—मनोहर, चित्रमय जगत, समीक्षक वगैरे मासिकांतून आणि झंकार, नवयुग, विविधवृत्त वगैरे साप्ताहिकांतून असे टीकालेख नेहमीं येतात ते पाहा. तसेंच धुंधुर्मास ( खांडेकर ), टाकीचे घाव ( फडके ), वाङ्मयविलास ( माडखोलकर ), हीं टीकालेखांचीं पुस्तकें वाचा.

**प्रश्न**—( १ ) टीकालेख म्हणजे काय ? ( २ ) टीकालेखाचा उपयोग

काय ? ( ३ ) टीकालेखांत कोणत्या मुद्यांवर विवेचन असतें ? ( ४ ) तुम्ही एका पुस्तकावर टीकालेख लिहा व त्यावर आलेल्या दुसऱ्या टीकालेखाशीं तो ताडून पहा.

---

## १५ प्रवासवृत्त

एकादा चांगला प्रांत किंवा प्रसिद्ध स्थळ पहाण्यास जाऊन त्याची समग्र हकीकत ज्या लेखांत देतात, त्यास प्रवासवृत्त किंवा प्रवासवर्णन म्हणतात. घरांतून निघाल्यापासून घरांत परत येईपर्यंत जें जें दिसेल व जे जें घडेल त्या सर्वांचें वर्णन लेखक प्रवासवृत्तांत करीत असतो. ज्या लेखांत प्रवासांत पाहिलेल्या स्थळांची भौगोलिक परिस्थिति, तेथलि लोक व त्यांचीं घरें, खाणें, पोषाख, प्रकृति, रीतरिवाज वगैरेंची माहिती, लोकांच्या सुखसोयीचीं साधनें, औद्योगिक प्रगति, शैक्षणिक व राजकीय भूमिका इचें संपूर्णपणें यथातथ्य चित्र मानवी जीवनास धरून रेखाटलेलें असतें, तें प्रवासवर्णन उत्कृष्ट होय. मासिकांतून अशा प्रकारचे लेख वरचेवर येतात. कांहीं प्रवासवृत्तें पुस्तकरूपानेंही प्रसिद्ध झालेलीं आहेत. प्रवासवृत्तें चटकदारपणें लिहिणें ही एक कला आहे व तसें तें असल्याशिवाय वाचकांस त्यांत गोडी वाटणार नाहीं. प्रवासवृत्ताचा एक नमुना म्हणून काकासाहेब कालेलकर यांच्या ‘ आमच्या देशाचें दर्शन ’ या पुस्तकांतील एक उतारा पुढें दिला आहे तो पाहा.

### आपला गोवा

“ गोमांतकाची निसर्गशोभा अनुपम आहे. काश्मीर आणि दाक्षिणेकडील केरळ येथील सगळी शोभा आणून जणूं काय निसर्गानें गोमांतक नटविलें ! आगगाडीनें जाताना घराची वन्य शोभा, डोंगर पोखरून खोदलेले बोगदे आणि सहा ऋतूंत हिरव्या दिसणाऱ्या वृक्षराजी चित्तवेधक तर आहेतच, परंतु काळी नदीनें दूधसागराचा बनविलेला धबधबा तर नुसता उन्मादकारी आहे......गोव्याला नद्या आणि खाड्या यांचा जणूं चक्रव्यूह बनला आहे...गोव्यांत जिकडे पाहावें तिकडे पाण्याचा जलजंजाळ

आपल्या सुंदरतेनें आपल्या चित्तास फुलकित करतो.

नारळ, सुपारी, केळीं, काजू, आंबे, कोकमे [ रातांबे ] इत्यादि वृक्षांची शोभा इतकी घन व गंभीर आहे कीं, जणूं काय या वृक्षराजींच्या परवानगीशिवाय माणूस वसाहतच करूं शकला नसता, असें वाटतें...

लोकांतून जुनें शिक्षण जरी नाहींसें होत चाललें आहे, तरी पण साहित्याची हौस मात्र कमी झालेली नाहीं. संगीताविषयीं गोवा विख्यात आहेच ! नृत्यकला व कलाकुसर आजतागाईतही अबाधित राहिल्या आहेत.

**अभ्यासः**--निरानिराळ्या मासिकांतून येणारे प्रवासवर्णनाचे लेख वाचा, शिवाय ' आमच्या देशाचें दर्शन, ' ' भक्तिकुसुमें, ' ' ब्रह्मदेशाचा प्रवास, ' ( काका कालेलकर ), धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ( काणेकर ), युरोपचा प्रवास ( काणे ), काश्मीरचा प्रवास ( मो. गो. काळे ) हीं आणि प्रिं. भाटे यांची प्रवासवर्णनाचीं पुस्तकें पाहा.

**प्रश्न:**--१ प्रवासवृत्त म्हणजे काय ? २--प्रवासवृत्तांत लेखक कशाचें वर्णन करतो ? ३--प्रवासवर्णनांत वाचकांना काय माहिती मिळते ? ४--तुम्हीं केलेले प्रवास वरील तंत्रानें लिहून काढा.

---

## १६ इतर वाङ्मय

**शास्त्रीय वाङ्मय**--मानसशास्त्र, शारिरशास्त्र, अर्थशास्त्र, विज्ञानशास्त्र वगैरे गंभीर विषयांवर अनेक ग्रंथ निर्माण झालेले आहेत. पण ते ग्रंथ बहुतेक प्रबंधस्वरूपाचे आहेत. मानसोपचार ( फडके ), विज्ञानबोध ( भाटे ), लंघनचिकित्सा ( किनरे ), छंदोरचना ( पटवर्धन ), आपलें आर्थिक नियोजन ( महाजनी ), अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें ( काळे ), इ० पुस्तकें हें शास्त्रिय वाङ्मय होय.

**पत्रवाङ्मय**--एखाद्या विषयावर निबंध, कथा, असें कांहीं न लिहितां त्या विषयावर पत्रें लिहूनच विवेचन करण्याची एक नवी तऱ्हा निघालेली असून, ती बरीच रूढ झालेली आहे. अशा प्रकारें कादंबरी किंवा कथा पत्रमय लिहितातच. पण इतरही वाङ्मय पत्रमय तयार झालेलें आहे. धुक्यां-

तून लाल ताऱ्याकडे ( काणेकर ), विवेकानंदांचीं पत्रें ( विवेकानंद ), प्रसाददीक्षा ( म. गांधी ), प्रापंचिक पत्रें ( पेंडारकर ), अनेक आशीर्वाद ( ताम्हनकर ), प्रेमपत्रें ( बांदेकर ), हितपत्रें ( पटवर्धन ) इत्यादि पत्रवाङ्मय पाहा.

**ऐतिहासिक वाङ्मय**—इतिहासविषयक वाङ्मय पुष्कळच तयार झालेलें आहे आणि होत आहे. सरदेसाई, राजवाडे, पोतदार वगैरे इतिहासप्रेमी विद्वानांनीं पुष्कळच ऐतिहासिक ग्रंथ लिहिले आहेत. शिवाजीचरित्र ( केळुसकर ), मराठे व इंग्रज ( केळकर ), भारतीय साम्राज्य ( नाना पावगी ), प्रतापगडचें युद्ध ( कॅ. मोडक ), आजकालचा महाराष्ट्र ( पाध्ये-टिकेकर ), प्राचीन भारत ( डॉ. बाळकृष्ण ), हिंदुस्थानचा इतिहास ( जी. एन. जोशी ), हीं इतिहासाचीं पुस्तकें वाचा.

**बालवाङ्मय**—मुलासाठीं तयार झालेलें वाङ्मय तें बालवाङ्मय. हें सर्व गोष्टीरूपांत आहे. पुराणांतील गोष्टी, अद्भुत गोष्टी, समाजांतलि गोष्टी, मुलांच्या जीवनावरच्या गोष्टी, उपदेशपर गोष्टी, असें यांचें विविध स्वरूप आहे. सोपीं सुटसुटीत वाक्यें, नेहमींच्या बोलण्यांतील परिचित भाषा, विस्तार वेताचा, पॅरे ( मुद्दे ) लहान लहान, टाईप मोठा, सुंदर सुंदर व विशेषतः बालजीवनांतील चित्रें अशी या पुस्तकांची अंतर्गत रचना असते. पुढील लेखक व संस्था यांचें बालवाङ्ममय वाचून पाहा. लेखक साने गुरुजी, शा. रा. भंडारी, द. के. बर्वे, भ. श्री. पंडित, टिल्लू, रायकर; संस्था—ढवळे प्रकाशन, नवभारत प्रकाशन, महाराष्ट्र ग्रंथभांडार (मुंबई), चित्रशाळाप्रकाशन, अनाथ विद्यार्थी गृह—प्रकाशन, आनंदकार्यालय (पुणें).

**प्रश्नः**—( १ ) बालवाङ्मय सगळें गोष्टीरूपच कां ? ( २ ) शास्त्रीय वाङ्मयाचे विषय कोणते ? ( ३ ) बालवाङ्मयांत कोणकोणत्या गोष्टी येतात ? ( ४ ) प्रापंचिक पत्रें या पुस्तकांत कोणत्या विषयाचें विवेचन असेल ? ( ५ ) ऐतिहासिक दोन ग्रंथ व त्यांचे लेखक सांगा.

# भाग दुसरा, काव्यवाङ्मय

## १ जुनीनवी कविता

जुनी कविता कोणती नी नवी कविता कोणती हें ठरवितांना, साधारण कालमान बघायचें झालें तर एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वीची ती जुनी कविता व त्यानंतर आजपर्यंतची ती नवी कविता असें म्हणता येईल. स्थूल मानानें असे दोन भाग पडल्यानंतर जुन्या कवींत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, एकनाथ, मोरोपंत वगैरेंची गणना होते. आणि नव्या कवींत केशवसुत, टिळक, तांबे, विनायक, गाटे तों आजच्या गिरिश, यशवंत, केशवकुमार, कुसुमाग्रज, ठोकळ, निकुंब यांची गणना होते.

जुनी कविता बहुतेक एका विषयाची व एका वळणाची वाटते. त्यांतील विषय म्हणजे पुराणें, ईश्वर, भक्ति नि मोक्ष असे पारमार्थिक होते, आणि त्यावर तयार झालेली कविता म्हणजे अभंग, ओव्या, आर्या, भूपाळ्या, इत्यादि प्रकारची होती. पण आज कवितेचा सगळाच मनु पालटला आहे. विषयाच्या आणि रचनेच्या दृष्टीनें तिच्यांत कितीतरी फरक झालेला आहे. ईश्वर, भक्ति, मोक्ष यांच्या त्रिकुटांतून सुटून तिनें राजमहालापासून तों शेतकऱ्याच्या झोपडीपर्यंत, आकाशांतील चांदण्यापासून तों जमीनिवरील गवतापर्यंत आणि सुखमय प्रेमापासून तों खडतर राष्ट्रसेवेपर्यंत सर्वत्र संचार चालविला आहे. ज्याच्यावर कविता झाली नाहीं असा आतां कुठलाही सामान्य विषय सुद्धां दाखवितां येणार नाहीं. इतकी तिच्यांत विविधता निर्माण झाली आहे.

या सर्व कवितेचे ठोकळ मानानें तीन वर्ग करतां येतील. १ स्फुटकाव्य, २ खंडकाव्य, व ३ महाकाव्य. यांतील पहिलें स्फुटकाव्य हें विपुल नी विविध आहे. दुसरें खंडकाव्य हें तुरळक तुरळक असें थोडेंसें आहे. आणि तिसरें महाकाव्य हें क्वचितच् कुठेंतरी एकादें आहे.

काव्य करणें ही अवघड कला आहे. विषय सुचला कीं त्यावर गद्यलेखक

चार वेड्या वाकड्या ओळी लिहील. कारण त्याला विशेष बंधनें नसतात. पण काव्यांत कशाही चार ओळी लिहितां यायच्या नाहींत. कवीला विषय सुचला तरी त्यास अनुकूल असें वृत्त निवडावें लागतें. प्रत्येक वृत्ताच्या मात्रा व गण ठरलेले असतात व त्या सांच्यांतच प्रत्येक ओळ बसवावी लागते. जो विषय निवडला असेल त्याचें संगतवार वर्णन करावें लागतें. आणि प्रत्येक शब्द अर्थपूर्ण व नादमधुर योजावा लागतो. कारण काव्य हें वाचण्यापेक्षां तालांत व सुस्वर आवाजांत गायचें असतें.

---

## २ विविध स्फुट कविता

स्फुटकाव्य म्हणजे फुटकळ कविता. अशा कविता सुचेल त्या विषयावर, आवडेल त्या वृत्तांत, व वाटतील तितक्या चरणांच्या बनविलेल्या असतात. असली एक कविता पुरी झाली कीं दुसऱ्या कुठल्याही विषयावर व कोणत्याही वृत्तात दुसरी कविता रचायला कवि मोकळा असतो. त्यामुळें कवि एकच असला तरी त्याची स्फुट कविता मात्र अनेक विषयांवर आणि निरनिराळ्या वृत्तांत आढळते आणि तसें आहे म्हणूनच आज स्फुट काव्यांचीं पुस्तकें आवडीनें वाचलीं जातात. स्फुटकाव्याकरितां कवि जर एकच विषय नीं एकच वृत्त वापरूं लागला, तर त्याचें स्फुट काव्याचें पुस्तक कुणीही हातांत धरणार नाहीं.

आज बरेंचसें स्फुट काव्य मराठींत निर्माण झालेलें आहे. आणि अजून होत आहे. त्यांत प्रेम, देशभक्ति, सृष्टीचें स्वरूप, निरनिराळ्या कल्पना, नवे विचार, मनाच्या भावना, व्यक्तिस्वभाव, बालजीवन, ऐतिहासिक प्रसंग, इत्यादि सगळे विषय प्रमुखपणें हाताळलेले दिसून येतात. त्यांतल्यात्यात प्रेमविषयक कविताच अधिक आहेत. याचें कारण हा विषय कवि नी रसिक याचा फार आवडता आहे. नमुन्याकरितां पुढें बालजीवन व सृष्टिवर्णन अशीं दोन विषयांवरील दोन स्फुट काव्यें दिलीं आहेत तीं पाहा.

### [ १ ] चाहूल–दिंडी

बाळ पाहे दारामधें बसून । वाट मातेची दृष्टि लांबवून ॥
म्लान होई मुख हांसरें विलोल । गालिं ओघळली आणि अश्रुमाळ ॥१॥

मृत्यूनें रे० टिळकांना जें दुःख झालें, त्या दुःखाच्या भरांत त्यांनीं ती कविता लिहिली. त्या कवितेंत बालकवीला उद्देशून, 'पांखरा, आतां परत येशील का ? तुझी मला सारखी आठवण होते. तुझ्या प्रेमाच्या किती तरी खुणा मजजवळ आहेत. माझे हे दुःखाचे श्वास हवेंत मिसळतील, ते ओळखून तरी तूं परत येशील का ?' असे सगळे करुण उद्गार आहेत, त्या काव्याची पहिली ओळ 'पांखरा येशिल का परतून ?' अशी आहे. याच कवितेचें विडंबन करून कवि केशवकुमार यांनीं खालील कविता कशी तयार केली आहे पाहा.

## परिटास—

परिटा, येशिल कधिं परतून ! ॥ धृ० ॥

कोट रेशमी लग्नामधला मानेवर उसवून !
उरल्या सुरल्या गुंड्यांचीही वासलात लावून !
बारिक सारिक हातरुमाला हातोहात उडवून !
सदऱ्याची या इस्तरिनें तव चाळण पार करून !
खमिसांचीं हीं धिरडीं खरपूस भट्टिमधें परतून !
तिच्या भरजरी पैठणिची या मच्छरदाणि करून !
गांवांतलि कपड्यांची सगळ्या गल्लत छान करून !
रुमाल जरीचे आणि उपरणीं महिनाभर नेसून !
सणासुदीला मात्र वाढणें घेई तुझें चोपून !

**अभ्यास**—झेंडूचीं फुलें ( केशवकुमार ), उपहासिनी ( य. गो. जोशी ), गाजराच्या पुंग्या ( आर. बी. समुद्र ), इत्यादि विडंबन काव्यें वाचून पाहा.

**प्रश्न**—(१) विडंबन काव्याचा हेतु काय ? (२) सदर काव्याचे मूळ उत्पादक कोण ? (३) मूळ काव्य व विडंबन काव्य यांत साम्य काय ? फरक काय ?

ग्र. क्र. २५८४७ ता. १४

## ४. जानपद गीतें

यांना ग्रामीणगीतें असेंही म्हणतात. हीं गीतें शेतकऱ्यांच्या कुणबाऊ भाषेंत असून त्यांत त्यांचें जीवन व आशा–आकांक्षा दर्शविलेल्या असतात. सुशिक्षितापेक्षां शेतकऱ्यांची भाषा बरीच निराळी असते. म्हणून ग्रामीणगीतें लिहिणारा कवि खेड्यांतला असला तर फार चांगलें. पण तसा तो नसला तरी त्याला ग्रामीण ऊर्फ कुणबाऊ जीवनाची पुरी माहिती, कांहींकाळ तरी त्याचा अनुभव आणि कुणबाऊ भाषेशीं चांगला परिचय असला पाहिजे. तरच त्या कवीचें ग्रामीण गीत उत्कृष्ट वठतें. अशा प्रकारें निर्माण झालेलें गीत खेडुतांना तर प्रिय होतेंच पण शहरवासियांनाही तें वैचित्र्यामुळें आनंद देऊं शकतें.

अशीं सुंदर ग्रामीण गीते मराठीमध्यें पुष्कळच तयार झालेलीं आहेत. नमुन्याकरितां कवि ठोकळ यांचें ‘ पावसा ’ हें पुढील गीत वाचा.

‘ पावसा ’ ( अक्रूर )

हीं भुई कशी ठाक कोरडी पडली ।
पावसा उतर ना खालीं ! ॥
हा पाणकळा सरुन चालला सारा ।
नग जाऊं असा परभारा ॥
कां राग असा गरिब्रावरती केला ? ।
जिकिरीस जीव हा आला ॥
भिजवली गुदस्ता वाडी ।
पर कसूर केलिस थोडी !
न्हायली न वैरण काडी ॥
काशिं जनावरं जगतिल पेस्तर सालीं ? ।
पावसा उतर ना खालीं ! ॥ १ ॥
कां शिपकारा नुसता मारुन जाशी ? ।
ठेवशी अम्हांस उपाशीं ॥
जर यंदा बी पुरं न पडलं पाणी ।
सावकार लाटिल गोणी ॥

लावून हात कर्माला ;
मग रोजगार करण्याला ।
लागल जावं ममईला ॥
ऱ्हाईल इथं एकटीच घरवाली ।
पावसा, उतर ना खालीं ! ॥ २ ॥

**अभ्यास**—कवि ठोकळ यांनीं संपादन केलेला जानपदगीतांचा 'सुगी' हा एक व त्यांचा स्वतःचा 'मीठभाकरी' हा एक, असे दोन्ही काव्य-संग्रह वाचा.

**प्रश्न**–(१) जानपदगीत कोणत्या कवितेला म्हणतात ? (२) कोणत्या कवीचें जानपदगीत सरस होईल ? (३) 'पावसा' या गीतांतील शेत-कऱ्याचे विशिष्ट शब्द शोधून काढा.

---

## ९ सुनीत किंवा सुनीता

**सुनीत**—हा काव्यप्रकार ओळखण्याची ढोबळ खूण म्हणजे चौदा ओळी. सुनीताला चौदा ओळी असाव्या असा एक नियम आहे. दुसरा नियम म्हणजे यांतील विचाराचा फेरबदल. पहिल्या ओळींत एक तर दुसऱ्या ओळींत दुसरा व पुन्हा तिसऱ्या ओळींत पहिला. अशा आंदो-लनानें सुनीताची रचना असते. याच्या रचनेची आणखी एक पद्धत आहे. तीमध्यें पहिल्या आठ ओळींत एक विचार व त्यापुढील सहा ओळींत दुसरा विचार प्रगट केलेला असतो. उदा०–दुःखदायक आठवणी-वर सुनीत असेल तर पहिल्या पद्धतीनें पहिल्या ओळींत दुःखाची आठवण, दुसऱ्या ओळींत सुखाची, तिसऱ्या ओळींत पुन्हा दुःखाची तर चौथ्या ओळींत पुन्हा सुखाची, असा क्रम होईल. पण दुसऱ्या पद्धतीनें पहिल्या आठ ओळींत सुखाच्या आठवणी व पुढील सहा ओळींत दुःखाच्या आठवणी अशी रचना होईल. चांगले कवि सुनीत रचतांना उदात्त भावना, गहन विचार आणि रमणीय कल्पना हे विषय विशेष पसंत करतात.

पुढील श्री. ठोकळ यांचें 'कष्ट व विश्रांति' हें सुनीत वाचा. त्यांत प्रत्येक ओळीओळींतून अर्थाचें आंदोलन व आठ, सहा ओळींचे दोन भाग कसे पडले आहेत पाहा.

**'कष्ट व विश्रांति' (सुनीत)**

तापे ऐन दुपार ही रखरखी, येती उन्हाच्या झळा
आंब्याच्या मधुनी क्वचीत हलती डोक्यावरी डाहळ्या
सूर्याचे पडले किती कवडसे तोंडावरी रोखुनी
आहे शेतकरी तरी पहुडला झोपेमध्यें गुंगुनी
काळींभोर पहा कशीं पसरलीं चोहींकडे ढेकळें
देई ताणुन अंग त्यावर कसा हा मोकळें साकळें
धोंडा एक उशास ठेवुन दिला, केली तयाची उशी
झोपेची तरि गच्च साखरमिठी याची सुटेना कशी!

* * * *

सोडोनी पडदे हळूच पडतों आम्ही पलंगावरी
जाते रात्र सरून पार अरधी, डोळा न लागे तरी,
गाद्या नी गिरद्या चिकार अगदीं, स्प्रिंगाहि देती हुशी
टोले मोजित सारखी बदलतों डोळे मिटोनी कुशी,
तो शेतें पिकवी स्वतः निथळत्या घामामध्यें न्हाउनी
आम्ही हुश्श करून घाम पुसतों पंखा करीं घेऊनी!

**सुनीता**—हा अगदीं छोटा काव्यप्रकार आहे. याला 'कणिका' असेंही म्हणतात. याचा विस्तार अवघा सहा ओळी असतो. पैकीं पहिल्या चार ओळींत एक कल्पना मांडलेली असते व सहाव्या ओळींत पहिल्या कल्पनेपेक्षां निराळीच कलाटणी दिलेली असून, पांचवी ओळ त्या दोन्ही कल्पनेच्या सांध्याप्रमाणें उपयोगात आणलेली असते. कलाटणीचें तंत्र गद्य प्रकारांतील लघुतमकथेसारखें धक्का देणारें असतें. अशी अनपेक्षित कलाटणी जीमध्यें असते तीच सुनीता उत्कृष्ट समजतात. एकंदर रचनेवरून सुनीता ही सुनीतची धाकटी बहीणच शोभते. लघुतमकथेच्या

विवेचनांत आचार्य अत्रे यांची जी लघुतमकथा दिली आहे, ती एक उत्तम गद्य-सुनीता समजायला हरकत नाहीं.

" जग " ही खालील सुनीता श्री. सुधांशु यांची आहे. पहिल्या चार ओळींत एक कल्पना मांडून शेवटच्या दोन ओळींत तिला कशी कलाटणी दिली आहे ती पाहा.

**जग—( सुनीता )**

जमतात पांखरें एका वृक्षावरी ।
अपुलाल्या गेहीं जातीं सायंतनीं ।
जमलेत जीवही तैसे जगतांवरी ।
आयुष्य संपतां जायाचें येथुनी ।
वाटतें मला जग—वृक्षचि हा प्राचिन ।
अन् प्राणी आपण त्यावरचीं पांखरें ।

**अभ्यास**—सुनीत हा काव्यप्रकार प्रत्येक कवीनें बहुधा लिहिलेला आहे. पण याचें स्वतंत्र असें पुस्तक नाहीं. कोणत्याही कवीचा काव्यसंग्रह पहाल तर त्यांत एकादें दुसरें तरी सुनीत तुम्हांला आढळेलच. सुनीतपेक्षां सुनीता मात्र कमी दिसून येतात मीठभाकरी ( ठोकळ ), यशोनिधि (यशवंत), मानसमेघ ( गिरीश ), एकदाणी ( पुरंदरे ) हे काव्यसंग्रह पाहून त्यांतील सुनीतें व सुनीता शोधून काढा.

प्रश्न—(१) सुनीत ओळखण्याची मुख्य खूण कोणती ? (२) सुनीतची रचना कशी असते ? (३) सुनीतचे विषय कोणते ? (४) सुनीता कशी ओळखावी ? (५) तुम्ही एकादी सुनीता रचून पाहा. (६) कोणत्या गद्य प्रकारांशीं सुनीताचें साम्य आहे ? कां ?

## ६ नाट्यगीत

संवादरूपानें लिहिलेल्या काव्यास नाट्यगीत म्हणतात. नाटकांत गद्य-संवाद असून ते अनेक व्यक्ति व प्रसंग यांवर आधारलेले असतात. पण नाट्यगीतांत एकाच प्रसंगावर फक्त दोन व्यक्तींचीं उत्तर-प्रत्युत्तरें अस-

तात. यांतील विषय मात्र घरगुती, सामाजिक, राजकीय किंवा विनोदी असा कोणताही असूं शकतो. याला 'द्वंद्वगीत' असेंही दुसरें नांव आहे. ज्या नाट्यगीतांत उत्तर–प्रत्युत्तर एकेका ओळींतच रचलें जाऊन एकंदर संवाद सुटसुटीत असा असतो, तें नाट्यगीत चटकदार होतें. पुढील नाट्यगीत पाहा.

## युद्ध याला कारण !—सुधांशु

[ युद्धकालीन महागाई व रेशनिंगचें बंधन असलेल्या काळांतील एक घरगुती नाट्यगीत. ]

ती म्हणाली—तांदळाची मूठही नाहीं घरीं
तो म्हणाला—भाकरीची आज चाखूं माधुरी ॥ १ ॥
ती म्हणाली—आज सरला साखऱ्या, नाहीं चहा
तो म्हणाला—'सोडुनी द्या' सांगती व्यक्ति महा ॥ २ ॥
ती म्हणाली—आणि विटलें वस्त्र जें मी नेसतें
तो म्हणाला—सुंदरांना कांहींही ना शोभतें ? ॥ ३ ॥
ती म्हणाली—गूळ आणि मोहरी होती हवी
तो म्हणाला—त्याविनाही भोजना येते चवी ॥ ४ ॥
ती म्हणाली—खोबऱ्याचें तेल कां ना आणितां ?
तो म्हणाला—कॉमिनिया काढ लावाया आतां ॥ ५ ॥
ती म्हणाली—थेंब ना राकेलही दीपांप्रती
तो म्हणाला—तेल गोडें निर्मितें शांति अती ॥ ६ ॥
ती म्हणाली—का मसाल्यावीण आतां चालतें ?
तो म्हणाला—त्वत्करींचें गोड सारें लागतें ॥ ७ ॥
ती म्हणाली—माल सध्यां चांगला कां ना मिळे ?
तो म्हणाला—लाभलेलें भाग्य हें रेशन्मुळें ॥ ८ ॥
ती म्हणाली—नाथ, असली कां दशा आली पण ?
तो म्हणाला—लाडके ग, युद्ध याला कारण ? ॥ ९ ॥

**अभ्यास**—'सिनेमांतील गोड गाणीं' (रायकर–टिल्लू), यांतील

नाट्यगीतें वाचा. शिवाय मासिकातून नाट्यगीतें प्रसिद्ध होतात तीं पाहा.

**प्रश्न**—(१) नाट्यगीत म्हणजे काय? (२) त्याची रचना कशी असते? (३) नाट्यगीतांतील संवाद कसे असावेत?

---

## ७ शाहिरी काव्य

या प्रकारांत पोवाडे व लावण्या यांचा समावेश होतो. हा प्रकार फार जुना असून तो वाचण्यापेक्षा ऐकण्यासाठींच निर्माण झालेला आहे.

**पोवाडे**--हें एक स्फूर्तिदायक राष्ट्रीय काव्य आहे. शूर वीरांनीं गाजविलेले पराक्रम व शौर्य हे त्यांचे मुख्य विषय आहेत. हें काव्य तयार करणाऱ्याना व म्हणून दाखविणाऱ्या लोकांना शाहीर म्हणतात. हें काव्य वाचतांना विशेष गोडी वाटत नाहीं पण शेंकडों लोकांचा फड जमलेल्या अशा मैदानांत एकादा शाहीर डफ, तुणतुणें व ढोलगें या आपल्या वाद्यांसह तें म्हणूं लागला कीं त्याचा खरा प्रभाव दिसून येतो आणि म्हणूनच लावण्या-पोवाड्यांचे कार्यक्रम गांवाघरांपेक्षां उरूस--यात्रेवरच विशेषतः रंगले जातात. हा पोवाड्यांचा प्रकार मागें होऊन गेलेल्या किंवा चालू काळांत घडलेल्या खऱ्या प्रसंगावरच रचलेला असतो. ऐतिहासिक प्रसंगावर रामजोशी, अनंतफंदी, सगनभाऊ, होनाजी बाळ या जुन्या शाहीरांनीं पुष्कळच पोवाडे तयार केलेले आहेत. पण आधुनिक शाहीरांनीं मात्र ऐतिहासिक व चालू घटकेच्या प्रसंगावर ते तयार केलेले आहेत. पोवाड्याच्या पोटविभागास 'चौक' म्हणतात. अनेक चौक मिळून एक पोवाडा होतो

**लावणी**--या काव्याचा विस्तार पोवाड्यापेक्षां कमी असतो. यांतील विषय म्हणजे तरुण मनाच्या भावना, समाजाची स्थिति, आध्यात्मिक असे विविध आहेत. याची रचना विशेषतः कल्पनेवर आधारलेली असते. पोवाड्यापेक्षां लावण्या ह्या विस्ताराप्रमाणेंच संख्येनेंही पण कमीच आहेत. शाहीर लोकांच्या म्हणण्यांत या येतातच. तथापि तरुणांच्या शृंगारिक भावना उच्चंबळावयास लावणाऱ्या लावण्या मुख्यत्वें 'तमासगीर' लोकांकडून म्हटल्या व ऐकविल्या जातात आणि म्हणूनच याचा श्रोतृवर्ग पुरुषप्रधान

असतो. शृंगारिक विषयाखेरीज इतर लावण्या किंवा पोवाडे यांच्या श्रोतृवर्गांत स्त्रीपुरुषांचा समुदाय असूं शकतो. आधुनिक शाहीरांचा कल मात्र लावण्या रचण्याकडे आढळून येत नाहीं.

पुढें एका पोवाड्याचा एक चौक दिला आहे. तो पाहा.

## नेताजींचा स्वातंत्र्यसंग्राम ( कवि—सुधांशु )

शिरे देशस्वातंत्र्यासाठीं । घेऊनि तळहातीं । पृथ्वीच्या पाठी । लढले जे शूर वीर झुंजार । मृत्यूची नव्हती ज्यांना दरकार । त्यांत सुभाष श्रेष्ठ ठरणार ॥

एकोणीसशें त्रेचाळीस सालाला । पंचवीस आक्टोबरला । ब्रिटिश साम्राज्याला । हादरा दिला सुभाष वीरानं । चकित केलं युद्धघोषणेनं । उसळले सैनिक त्वेषानं ॥

लावुन खांद्याला खांदा मर्दांच्या । युवति भारताच्या । लढति, शौर्याच्या । कथा त्यांच्या कितिक इतिहासांत । नेताजींच्याहि आझाद सैन्यात । झांशीची राणी पलटण विख्यात ॥

नेताजींनीं पाजुनि चैतन्य । चेतविलें सैन्य । विषय त्यांना अन्य । ठावा नच हिंदराष्ट्रावांचून । आझादिसाठीं अर्पायासि निजप्राण । सज्ज झाले त्यासि अडविणार कोण ॥

हंबीरराव मराठी सैन्याला । आझाद सेनेला । सेनापति झाला । सुभाषचंद्र वीर तसाच झुंजार । दास्यांतुन माय मुक्त करणार । प्रतिज्ञा केली त्यानं अतिघोर ॥

( चाल ) जयहिंद करीत गर्जना । चालली आझादीं सेना ॥
चलो दिल्ली ध्येयवाक्यांत । गुंतलें तयांचें चित्त ॥
देशार्थ कराय कुरबान । उत्सूक तयांचें मन ॥
नेताजींच्या शब्दासाठीं । प्र णांची देती आहुती ॥

(चाल) महापुरासारखा लोंढा होता चालला ॥
अडवितील तयांना पाठवीत स्वर्गाला ॥
आवरेना प्रवाह लढवय्या ब्रिटिश वीराला ॥
अडविणें सिंह कां शक्य कधि मशकाला ॥

TRBK-0102595



न सुभाषचंद्राला ॥
चढलं आझाद सैन्याला ॥
... ... ... ... ... ते काय त्याला ? ॥
पाठवणी करिति स्वर्गाला । धडाकि भरली चमत्कार बघुन
चर्चिलसाहेबाला ॥
(मूळ चाल) दिसेंबरच्या तीस तारखेला । पोर्टब्लेअरला । सैनिक पोंचला ।
फडकला झेंडा तिरंगी प्यार । झाला सर्वांना हर्ष अनिवार ।
गेला जयघोष नभाच्या पार ॥१॥

**अभ्यास**—शाहीर खाडिलकर, दीक्षित, निकम, नानिवडेकर यांचें पोवाडेगायन ऐका. त्यांचीं आधुनिक पोवाड्यांचीं छोटीं छोटीं पुस्तकें वाचा. शिवाय य. न. केळकर यांनीं संपादन केलेला ‘ ऐतिहासिक पोवाडे ’ हा संग्रह वाचा.

**प्रश्न**—(१) पोवाड्याचे विषय कोणते दिसून येतात ? (२) पोवाडा व लावणी यांत फरक काय ? ( ३ ) शाहीर कोणास म्हणतात ? ( ४ ) नमुन्याकरितां पोवाड्याचा एकादा चौक तयार करून पाहा.

---

## ८ खंडकाव्य

... जें विवेचन केलें आहे, त्यांतील कादंबरीची माहिती तुम्हाला झालेली आहे. कादंबरीच्या तंत्राप्रमाणेंच व्यक्ति आणि प्रसंग यांची कथा खंडकाव्यांत सांगितलेली असते. फरक इतकाच कीं, ही सगळी कथा काव्यांत वर्णन केलेली असते. या दृष्टीनें खंडकाव्याला काव्यरूपी कादंबरी म्हणायला कांहींच हरकत नाहीं. हें खंडकाव्य सांगण्याच्या सोयीसाठीं सुरवातीपासून अखेरपर्यंत एकाच वृत्तांत रचलें जातें व तें बहुधा साकी वृत्तांत असतें. मात्र काव्याची भाषा सोपी, नादमधुर नि ओघवती असते. खटकणारा किंवा कानाला कटु लागणारा शब्द चुकूनही कुठें यायचा नाहीं ! तसेंच एकच वृत्त कंटाळवाणें होऊं नये म्हणून कांहीं मुरब्बी कवि आपल्या खंडकाव्यांतून प्रसंगाला योग्य अशीं